# भावबंध पंचक हे!

३



कुमारी शक्तिलीला (निकिता राजेश पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# भावबंध पंचक हे!-३

(द्रौपदीवरील त्रिखंडात्मक कादंबरीचा तृतिय खंड)

निकिता राजेश पाटील

**एका विद्यार्थिनीने** लिहीलेलं हे पुस्तक.

तुम्हाला विनामूल्य वाचायला देण्याचा एकच हेतू आहे, तो म्हणजे तुमचा अभिप्राय जाणून घेणं. या विचारांच्या जडणघडणीत सुजाण वाचकांच्या सूचनांचा आभारपुर्वक समावेश करणं.

वाट पहातो आहोत. फ़ोन, whatsapp, email साधे पत्र कोणत्याही पद्धतीने आपला अभिप्राय नक्की पोहोचवा.


# निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ,
वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

# भावबंध पंचक हे!- ३

## (द्रौपदीवरील त्रिखंडात्मक कादंबरीचा तृतिय खंड)


लेखिका- निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com



**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
eternity,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : ३१ ऑगस्ट २०२२ (गणेशचतुर्थी शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# भावबंध पंचक हे!- ३

(द्रौपदीवरील त्रिखंडात्मक कादंबरीचा तृतिय खंड)

**निकिता राजेश पाटील**

**परिचय :** नाव:-निकिता राजेश पाटील.



वांगणीत वास्तव्य.

"कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन.

**वाङ्मयीन परिचय-**

१. चंद्रिका मासिकात श्लोक लेखन.

२. टिळक नगर सांस्कृतिक महोत्सवात 'द्रौपदीचे स्वगत' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण. (वेशभूषा, प्रयोग लेखन, फार्सलेखन यांचा मेळ )

३. विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात (सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन हा ललित लेख, 'मनाचे प्रदुषण' ही कविता व 'बायको नावाचं अजीब रसायन' ही विनोदी कथा प्रकाशित.

४. डोंबिवलीतील आणि बदलापुरात काव्य संमेलनात सक्रिय सहभाग.

५. अनेक निबंध, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक.

६. संस्कृत भाषेतील श्लोक लेखनासाठी 'अमृत गौरव' पुरस्कार

७. अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात नाट्याचार्य 'कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर' या लेखाचे लेखन,

८. मानव विद्या विभागात 'वाचन संस्कृती' - 'डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व' या विषयांवर संशोधन,

९. 'फार फार वर्षांपूर्वी' व 'संघर्ष' व 'सीमान्त' या तीन पुस्तकांवर केलेली समीक्षा, त्यातील 'संघर्ष' या पुस्तकाच्या समीक्षेला पुरस्कार प्राप्त.

१०. 'मनोजन' या मासिकात 'मानसिक आरोग्याचा मूलमंत्र' या विषयावर लेख. 'सृजन' या वार्षिकात कविता आणि लेख प्रकाशित,

११. चित्रकलेत गोल्ड मेडल.

१२. ई साहित्यावर एक रहस्य कथासंग्रह, दोन कादंबऱ्या (द्रौपदीवर आधारित), अद्भुत कथासंग्रह, विडींबन काव्य संग्रह, चार आध्यात्मिक

ग्रंथ, एक विज्ञान लेखमाला, ‘अधातो धर्म जिज्ञासा ‘ हिंदू तत्वज्ञाना व अध्यात्म’ या विषयावर आधारित तीन भाग प्रकाशित, अशी एकूण तेरा पुस्तके प्रकाशित झाली.

१३. ‘अथातो धर्म जिज्ञासा’ या हिंदू तत्त्वज्ञान व अध्यात्म विषयावर प्रबंध.

१४. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या ‘धर्म’ संकल्पना सादरीकरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत. त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

शिक्षण:- एसवाय बीए,

माझी ही कादंबरी आवडल्यास shaktileelanikita@gmail.com या ईमेलवर अभिप्राय देण्यासाठी संपर्क साधू शकता. माझी इतरही पुस्तके डाऊनलोड करून तुम्ही वाचण्याचा मनमुराद आनंद घेऊ शकता.

फोन नंबर:- ८६८९९५४८०६👸 👰 👸

# अर्पणपत्रिका




***<u>तुझी पुत्री आणि शिष्या,</u>***

***<u>कुमारी शक्तिलीला..</u>***

# उपोद्घात



'भावबंध पंचक हे' या महाकादंबरीचे तृतीय दल आहे. शक्तिच्या इच्छेप्रमाणे ही महाकादंबरी त्रिदलात्मक पूर्ण होते आहे.

हे तृतीय दल अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून महत्त्वाचे आहे. कारण पांडव- द्रौपदीचा हस्तिनापुरातील प्रवेश ते त्यांच्या महाप्रस्थानापर्यंत संपूर्ण घटनापट मी दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. मी हा घटनाक्रम मूळ महाभारताप्रमाणे ठेवण्याचा प्रयास केलेला असला तरी, काही कल्पनारम्य प्रसंगही जोडले आहेत.

या अश्वमेध व महाप्रस्थान पर्वातून शिकण्यासारखे बरेच काही आहे.

हस्तिनापुर प्रवेशासमयी पांडव- द्रौपदीना भेडसावणाऱ्या पूर्वाश्रमीच्या स्मृती, मात्र त्यातून सावरून वर्तमानाकडे लक्ष देणं व कर्तव्ये पार पाडणे गरजेचं असतं हे त्यांना उमगते.

वृषाली – पांचाली मिलनाच्या वेळी इतरांच्या अपराधाची आत्मग्लानी, पश्चाताप स्वतःवर ओढवून घेणं हे अविवेकाचे नव्हे तर, स्वतःवरही अन्याय करण्याचे लक्षण असते, हे कळते.


याशिवाय महाप्रस्थान पर्वातून आपल्याला वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रमाचा बोधही प्राप्त होतो. आयुष्याच्या उत्तरार्धात आपण कशा प्रकारे प्रत्येक गोष्टीचा,वस्तूचा मोह त्यागला पाहिजे, आपण कसे अनासक्त व्हावे, याचे उत्तम ज्ञान महाप्रस्थान पर्वातून प्राप्त होते.


अशा प्रकारे ही त्रिदलात्मक कादंबरी ज्ञान- तत्त्वज्ञान आणि नवरसांनी युक्त आहे. कारण या कादंबरीचा मूळ आधार महाभारत आहे, जे सर्व प्रकारच्या रसांनी, ज्ञान – तत्वज्ञानांनी परिपूर्ण महाकाव्य आहे, जो पंचम वेद असून प्रस्थानत्रयीमध्ये ज्याचे विशेष स्थान आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्षाच्या ज्ञानाने

*युक्त अशा या महाभारतात जे काही आहे, तेच या विश्वात आहे. जे महाभारतात नाही, ते या विश्वात नाही.*

## स्वस्ति अस्तु ||

भावबंध पंचक हे- या त्रिखंडात्मक कादंबरीचे पहिले दोन भाग. क्लिक करताच उघडतील.



# भावबंध पंचक हे

## तृतीय दल

## कुमारी शक्तिलीला

## (निकिता राजेश पाटील)



# षष्ठम बंध

***ॐ श्री गुरवे नमः| ॐ श्री प्रेरणायै नमः|***

***ते*** अत्यंत दुष्कर कार्य होते, पांडवांना नि पांचालीला महाअतिदुष्कर! पांडवांच्या मनात हस्तिनापुराबाबत, त्याच्या राजमहालाबाबत दिर्घकालीक कटु स्मृती होत्या.

पांचालीच्या हदयातही अल्पकालीक परंतु अत्यंत कटु, अवमान जनक स्मृती होत्या, हस्तिनापुर व हस्तिनापुराच्या राजसभेबाबत!

आज त्या स्मृतींचा कटु स्वाद मनातून जिव्हेवर येऊन रेंगाळला होता, ज्याचे प्रथम लक्षण पांडव-पांचालीला प्रथमतः हस्तिनापुरात प्रवेश करताच जाणवले होते. आणि

आजही जाणवत आहे, उजाड हस्तिनापुराच्या विराण राजमहालात प्रवेश करताना!

त्या सर्वांनी मन घट्ट करत राजमहालात प्रवेश केला...

युधिष्ठिराच्या निर्देशानुरुप प्रत्येक पांडव तसेच द्रौपदी सर्वप्रथम शूचिर्भूत होण्यासाठी आपापल्या कक्षात प्रयाण करते झाले.

पांचाली तिच्या नियत कक्षात आली, जो महाल कुरुकुलाने त्याच्या ज्येष्ठ वंशवधूकरिता निश्चित केला होता.

द्रौपदीने आपले केश अलगद मुक्त सोडले. तशा नागिणीप्रमाणे वळवळत्या व सागराप्रमाणे असीम असणाऱ्या केशांच्या बटा हिंदोळे घेत तिच्या वस्त्रावर स्थिरावल्या. ती हलक्या पावलांनी जशी गवाक्षात वळली, तशी ते आद्र्रभूमीवर अथंरलेले आच्छादनवस्त्र दिसले. तशाच रंगाच्या आच्छादनवस्त्रावरुन याच कक्षातून दु:शासनाने तिचे केश धरुन फरफटत नेले होते.

पुनः तेच दृश्य तिच्या नेत्रांसमोरुन क्षणभर तरळले. त्याच वेदना तिच्या केशांना जाणवल्या.

“नाही, दु:शासना! हे अधम कृत्य करू नकोस अन्यथा तुझा विनाश होईल. माझे केश सोड.” ती पुनः त्या प्रसंग कालात प्रविष्ट झाली होती.

तितक्यात कोणाचा तरी हात तिच्या स्कंधावर पडला.

ती क्षणार्धात भानावर आली, तिने वळून पाहिले, तो सहदेव होता.

“आर्यपुत्र, आपण?” पांचालीने स्वतःला सावरत म्हटले, “मी अशीच आपली गवाक्षातून कक्षाचे निरीक्षण करत होते!”

“कक्षाचे गवाक्षातून केले जात नाही, तर कक्षाच्या बाहेरच्या परिवेशाचे केले जाते.” सहदेवाने औदासिन्याने स्मित केले. हे ऐकून द्रौपदीची सजल दृष्टी झुकली.

“आर्य, हे सत्य आहे की मी आता तेच दृश्य स्मरण करून दु:खित तसेच क्रोधित झाले आहे. परंतु आपणही दुःखी व्हाल म्हणून मी तुम्हाला सांगायचे टाळले.” पांचालीने म्हटले, “ आपणांस कळलेच आहे, तर आपणांस कथन करणे हे माझे कर्तव्य आहे.”

असं म्हणून तिने सर्व काही सांगितले. ते सर्व श्रवण करून सहादेव स्वयम् दुःखी झाला. त्याला दुःखी पाहून पांचालीने स्वतःला- त्याला सात्वंना देत म्हटले, “मी निश्चितच या स्थितीतून सावरेन, धैर्य साधेन.”

पांचालीच्या या शब्दांवर सहदेवाने गांभीर्याने म्हटले, “उचित म्हणतेस, कारण या पुढची छत्तीस वर्षे आपल्याला याच महालात निवास करावा लागणार आहे. म्हणून या कटू स्मृतीतून उद्भवणाऱ्या वैष्यमता, उद्विग्नता तसेच भावुकतेवर आपण नियंत्रण प्राप्त करणे आवश्यक आहे.”

"आर्यपुत्र! आपले शब्द समयोचित आहेत, किंतु आपल्या म्हणण्याचं तात्पर्य काय? आपण ३६ वर्षांचा उल्लेख का केलात? मी मान्य करते कि ३६ वर्षे हा कालावधी थोडाथोडका नाहीये! पांचालीने विचारले, "मात्र आपण ३६ वर्षांनंतर इंद्रप्रस्थास प्रस्थान करणार आहोत की वनात?"

क्षणार्धात तिच्या लक्षात आले की ३६ वर्षांनंतर तर यादव कुलांचा संहार होणार आहे आणि कृष्णाचे गोलोकगमन.

"याचाच अर्थ आर्यपुत्र........." पांचालीने वैषम्यपूर्ण स्वरात म्हटले, "म्हणजे........ आपलं जीवन कृष्णानंतर...."

"तू उचितच म्हणालीस, पांचालकन्ये! आपण ज्याचा त्याचा विचार करतो त्याला अनेक कंगोरे असतात. आपल्याला वाटते ३६ वर्षांनंतर यादव कुळाचा नाश

झालेला असेल, मात्र याशिवाय अजून काय काय नष्ट होणार आहे, याची आपल्याला कल्पना नाही. म्हणून आपल्यालाही या क्षणापासून अनासक्त व्हायचे आहे कृष्णे!''

''आर्यपुत्र! जे माझं कधीच नव्हतं आणि ज्याला मी कधीच आपलं मानलं नाही, त्याविषयी कसली आसक्ती नाही. मात्र आर्य......''द्रौपदीने एक निश्वास टाकला, जड झाल्यागत..........

'' तुझ्या कटु स्मृतीविषयी तुला चिंता वाटते ना?'' सहदेवाने विचारले.

''ते तर आहेच, प्राणनाथ! किंतु मला दुःख वाटते आहे की मी अशा महालात निवास करण्यासाठी विवश आहे, ज्या महालात माझ्या पतीविरुद्ध कटकारस्थाने रचली गेली, त्यांना जिवे मारण्याची प्रयास केले गेले, माझ्या व माझ्या पतींचा वारंवार घोर अपमान करण्यात आला, त्याच

महालात माझा निवास! पाहून दुर्दैव ते कुठलं?" पांचाली दुःखी झाली.

"मी तुझे दुःख समजू शकतो. विवाहानंतर हस्तिनापुरात असताना तू जे म्हटलेस, ते माझ्या आजदेखील स्मरणात आहे की ज्या हस्तिनापुरात माझ्या पतीच्या द्वेष, मस्तर केला जातो व त्यांच्याविरुद्ध कटकारस्थाने रचली जातात त्या हस्तिनापुरात मी स्वस्थपणे श्वास देखील घेऊ शकत नाही." सहदेवाने तिच्या स्कंधास जोपासले, मला ज्ञात आहे."

"आर्यपुत्र, हे सत्य आहे मला त्याक्षणी ज्ञात नव्हतं की मला याच हस्तिनापुरात माझ्या आयुष्याच्या उत्तरार्ध व्यतित करावा लागणार आहे." पांचालीने म्हटले.

"शांत, कृष्णे! मी तुझी नि आमची दु:सह मनस्थिती जाणून आहे. म्हणूनच आम्ही देखील सावरण्याचा प्रयास करतो." सहदेवाने म्हटले.

“देवी, आपल्या राजस्नानाचा समय झाला आहे. स्नानागारातील कुंडाचे जल उत्तम प्रकारे समशीतोष्ण झाले आहे. याशिवाय चंदन तसेच सुगंधी तेल आदि सामग्री सज्ज आहे. आपण चलावे.” तितक्यात परिचारिका दृशानीने म्हटले, “क्षमा असावी, सम्राट व सम्राज्ञी! आपणा उभयंतामध्ये मला हस्तक्षेप करावा लागला.”

“इदंमस्तु!” सहदेवाने म्हटले, “पांचाली, मीदेखील स्नान करतो. कारण राज्याभिषेकाचे विधी पूर्ण करायचे आहेत ना.” असे म्हणून त्याने प्रस्थान केले.

पांचालीनेही स्नानागारात प्रयाण केले. दासीच्या सूचनेनुरुप पांचाली त्या कुंडात आसनस्थ झाली. प्रथमतः परिचारिकांनी द्रौपदीच्या मुखमंडलावरील अन् संपूर्ण शरीरावर चंदनचूर्ण लिप्त केले. सुगंध तेलाने तिला स्नान घालून पुनः तिच्या शरीराला सुगंधी द्रव्यांचा शिडकावा केला. त्यानंतर त्या सर्वजणींनी तिचे लांबसडक केश हाती

धरत व त्यावर सुगंधी तेल तसेच आवळ्याचा चिक लिप्त केला.

त्यानंतर सर्व सेविकांनी दुग्ध, पाच प्रकारची सुगंधी द्रव्यांचे जल, त्यानंतर जल तिच्या आपदमस्तक शरीरावर अभिसिंचित केले. तिचे आद्र व लांबसडक केश त्यांनी चंदनाच्या धुपदाणी वर सुकवले. त्याचप्रमाणे त्या सर्व सेविकांनी तिच्या शरीरालाही चंदनाच्या धुरी दिली. तसा सुगंधी द्रव्यांचा उग्र दर्प सर्वत्र (स्नानागारात) पसरला.

सेविकांमधील एका सैरंर्ध्रीने-केशिकेने पांचालीचे भृंगरुचिर व मादर्व शुचिर दाट केश धरत विचारले, “महाराणी, आपणांस कशी केशरचना करुन हवी आहे? प्रवेणी, त्रिवेणी, केशपाश की रत्न अलंकृत वेणी?”

पांचालीने केशिकेकडे वळून पाहिले, तिच्याकडे पाहून पांचालीला तिच्या अज्ञातवासाचे दिवस स्मरले (प्रकर्षाने). तीही सैरंधी झाली होती, तिला सुदेष्णाची सेवा करावी

लागत होती. तिच्या स्वतःच्या पतींची दुरावस्था तिला पहावी लागत होती. याशिवाय तो कीचक तसेच त्याचे १०५ भ्राते.......

तिने स्वतःच्या त्या स्मृतींना तिथेच अडवले, "केशिके, फक्त माझ्या केशांची सामान्य वेणी बध्दित कर. याशिवाय एक स्वर्ण फुल व एक रत्नमाला माझ्या केशांत मंडीत कर."

"आज्ञा प्रमाण, सम्राज्ञी!" असे म्हणून तिने तिचे केश बांधले.

"देवी, ही पांडवांनी पाठवलेली आपल्याकरिता वस्त्रे. या पैकी एखादी वस्त्र आपण धारण करावे, अशी त्यांची इच्छा आहे." दुसऱ्या सैरंधीने-वसनांशिकेने पांचालीला म्हटले.

पांचालीने ती सर्व वस्त्रे पाहून घेतली. त्यातील काही वस्त्रे गडद रंगसंगतीची होती, तर काही वस्त्रे सौम्य

रंगसंगतीची. काही वस्त्रांवर रत्ने जडवलेली होती तर काही वस्त्रांवर हिरे.

पांचालीला हिरेजडित अथवा रत्नमयी वस्त्रे या राज्याभिषेकासमयी परिधान करायची नव्हती. निदान आपल्या मृत प्रियजनां व प्रजाजनांच्या स्मृती मस्तकात घोंघावत असताना तरी.

म्हणूनच पांचालीने स्वर्णधाग्यांची नक्षी असलेले केशरी वस्त्राचे चयन केले. कारण अन्य वस्त्रे हिरेजडित रत्नमयी वा गडद रंगसंगतीची होती.

तिने वस्त्रे परिधान केली, सामान्य घडणाळीचे मोजकेच मात्र रत्नजडित सुवर्णालंकार धारण केले. शृंगार झाल्या नंतर ती दास्यांसह आपल्या पतीच्या महालात गमित झाली. त्या महालात सर्व पांडव आपापले अलंकार धारण करत होते. त्यांनीही मोजकेच आभूषणे व सौम्य रंगाची वस्त्रे परिधान केली होती.

“प्रणाम, आर्य!” पांचालीने म्हटले, “चलावे, आपण राजसभेत!”

“तू इतक्यात सज्ज झालीस! उत्तम! युधिष्ठिराने म्हटले, “तूही आमच्याप्रमाणे मोजकेच आभूषणे तसेच सौम्य वस्त्रे धारण केली आहेस, कल्याणी!”

“आर्यपुत्र! हा राज्याभिषेक पूर्वीप्रमाणे वैभवसंपन्न व आनंदमय चक्रवती साम्राज्याचे प्रतिग्रहण करणे नव्हे, तर आपल्या शेष प्रजाजनांचे दायित्व आहे, म्हणून.........”

“म्हणूनच मी सौम्य रंगसंगतीची वस्त्रे चयन करणेच उचित समजले, आर्य!” पांचलीने वाक्य पूर्ण केले.

“आम्हीदेखील तोच विचार केला, जो तू विचार केला आहेस.” सहदेवाने उत्तरीय धारण केले.

“याशिवाय आम्ही अशा या परिस्थितीत अतिशृगांर करु शकत नाही, ज्या ज्या परिस्थितीत आपण सर्वांनी तसेच

आपल्या प्रजाजनांनी आपले सर्वस्व गमावले आहे.” अर्जुनाने आपल्या सजल नेत्रांच्या कडेवर अंजन रेखले.

“उचित म्हणालात, आर्य, मीही शृंगार करु शकले नाही. कारण माझ्या नेत्रांसमोर मृत प्रियजनांच्या प्रतिमा तरळत होत्या.” पांचालीच्या नेत्रांत अश्रू तरळले.

“आम्हाला असं वाटत होतं, या दिवशी आपण आपल्या पुत्रांना राज्यसिंहासन सोपवून आपल्या दायित्वातून तसेच राजकार्यातून मुक्त होऊ आणि आपण सर्वजण संन्यस्त होऊ.” भीमसेनाने म्हटले, “आपल्याला वाटले, आपण अधिकारांपासून वंचित राहिलो. आपल्याला वनवास प्राप्त झाला. आपल्या पुत्रांबाबत तसे घडू नये. अशी आपण प्रार्थना केली होती. मात्र तरीही आपले पुत्र अधिकारा- पासून वंचित राहिले व मातृपितृसौख्यापासूनही.” नकुल त्याच्याशी सहमत झाला.”उचित म्हणालास, भ्रात्या! किंतु आता आपल्याला

आपल्या कन्येची-सुहोत्रवाहिनीची चिंता केली पाहिजे. तिचा विवाह लवकरात लवकर पार पाडला पाहिजे. मात्र या आर्यवर्तात असा कोणीही वीर पुरुष जिवित राहिलेला नाही की, ज्याच्याशी आमची ही सर्व प्रिय कन्या विवाह करेल. आता तिचा विवाह कसा पार पडेल, पांचाली? नकुलाने सर्वप्रथम समयोचित चिंता व्यक्त केली.

“चिंता नको करुस, नकुला! आपण तिचा विवाह कृष्णाच्या पौत्राशी-वज्राशी निश्चित करु या. माझ्या मते, वज्र हाच आमच्या सुहोत्रवाहिनीचा उचित वर आहे.” सहदेवाने निर्धाराने व ठामपणे म्हटले, “अन्य, भ्रातेहो! व पांचाली! तो इतक्या ठामपणे म्हणत होता. कारण तो होत्रवाहिनी, वज्र व अन्य यादवांचं भविष्य जाणत होता.

“मात्र, तो तर कृष्णाचा पौत्र आहे ना? यादव? आणि गांधारीच्या शापानुरुप.......” अर्जुनाने स्वतःचे वाक्य

अर्धवट सोडले, “तुला वाटते का सहदेवा, तुझी पुत्री विधवा........”

द्रौपदीने त्याच्या मुखावर हात ठेवला, “आर्यपुत्र, हे काय बोलताहात? बोलताना काहीसा विचार करा. आपली कन्या आहे ती! आणि तिच्याबाबत जर आर्यपुत्र सहदेवांनी निर्णय घेतला असेल, तर तो उचितच असेल. कारण ते भविष्यातील घटना जाणताहेत. त्यांनाही आपल्या पुत्रीच्या भवितव्याची चिंता आहे. त्यामुळे तिच्या व तिच्या पतीच्या जिविताचे अवश्य रक्षण होईल.”

“द्रौपदीने उचित म्हटले आहे.” सहदेवाने म्हटले, “ऋतानृते! राज्याभिषेकाचा मुहूर्त उलटून चालला आहे. आपल्याला राजसभेत प्रस्थान केले पाहिजे.

ॐ ॐ ॐ

**पा**चही पांडव राज्यसभेत प्रवेशले. त्याक्षणी त्यांना तीव्रतेने स्मरले, की याच राजसभेत त्यांच्या पिता- राजा पांडू दिग्विजयानंतर राजसिंहासनावर विराजमान झाला होता. त्याच्यासह पांडुपुत्रांच्या माताही - कुंती व माद्री देवी आसनस्थ झाल्या होत्या. मात्र त्यानंतर त्यांच्या भाग्यात आलेल्या वनवासाने -पांडुपुत्रांनाही आयुष्यभराचा वनवास प्राप्त झाला होता. त्यानंतरच याच महालत त्यांचा वारंवार झालेला अपमान, त्यांच्याविरुद्ध रचलेले षड्यंत्र, त्यांना ठार करण्याचे कट-कारस्थान सर्वकाही पांडवांना स्मरत होते. त्यांना एक भयंकर घटना स्मरली, ती म्हणजे पांचालीचे वस्त्रहरण व त्या सर्वांच्या सर्वस्वाशी खेळणारा द्युताचा तो खेळ. त्या खेळामध्ये पांडवांनी वैभव,रत्ने, सुवर्ण

गजांतलक्ष्मी, नगर, मान-सन्मान सर्व काही गमावलं होतं. फक्त हेच नव्हे, तर पत्नीच्या दृष्टीतील स्वतः विषयी आदर आणि विश्वासही त्यांनी गमावला होता. त्यानंतर पुन्हा द्युत व शांती प्रस्ताव नाकारणे-- आणि सरतेशेवटी हा विनाश.

पांचालीनेही त्यांच्या मागोमाग आपले पाऊल राजसभेत टाकले, तसे तिला प्रकर्षाने स्मरले, तिचा गृहप्रवेश, ज्याक्षणी कौरवांनी व दुष्ट बुद्धी कर्णाने तिच्या विवाहाचा उपहास उडवला होता. त्यानंतर कौरवांनी पांडवांना कस्पटासमान मानून त्यांच्यापुढे फेकलेला खांडवप्रस्थाचा उपखंड......... त्यानंतर ती चक्रवर्ती सम्राज्ञी असताना राजसूय यज्ञावेळी दुर्योधनाची तिच्यावर व पांडवाच्या संपत्तीवर असलेली लालसी दृष्टी............

आणि घृणात्मक प्रसंग म्हणजे वस्त्रहरण. याच सभेत दु:शासनाने तिच्या केशांना हिसके देत फरपटत आणले होते. त्यामुळे तिचे वस्त्र अर्धे ढळले होते. तिचे अर्धवस्त्रे ढळलेले

पाहून पांडवाची मुखे अतिवर्षेने भंगलेल्या कमलवृत्तांप्रमाणे झुकली व पांचालीच्या मुखावर क्रोधाचा भाव उमटला होता. ते पाहून कौरवांच्या हास्य आणि अन्य सभाजनांचे कामुक दृष्टीक्षेप, याशिवाय त्या सूतपुत्राचे जिव्हारी लागणारे शब्द व सरतेशेवटी वस्त्रहरण.

हे सर्व काही याच सभेत घडलं होतं. तिची मानखंडना, तिच्या जीवनातील व आर्यावर्तातील सर्वात पीडादायक अवमान, याच राज्यसभेत सर्वांदेखत घडला होता. त्याच सभागृहात प्रवेशताना ऋतानृतेची पावले अडखळली, श्वासांची गती वाढली. तिने मनोमन विचार केला, ज्या राज्यसभेत तिची निर्घृणपणे विटंबना झाली, त्याच राजसभेत तिचा राज्याभिषेक..........

तिला हे सहन होत नसलं, तरी तिने स्वतःवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत राज्यसभेत प्रवेश केला, तसा तिच्या व पांडवांच्या मस्तकावर स्वर्णपुष्पांचा तसेच पुष्प दलांचा

वर्षाव करण्यात आला. ही पुष्पवृष्टी कृष्ण अन् यादवांनी केलेली होती. मात्र कृष्ण, बलराम, वसुदेव, देवकी, सत्यभामा तसंच रेवती इत्यादी यादव- यादव स्त्रियांच्याही नेत्रात दुःख होते, या विनाशाचे व भावी यादवींचे दुःख!

त्या सर्वांच्या नेत्रांत समानुभूती पाहुन पांचालीचे- पांडवाचे दुःख हलके आले, मात्र त्यांच्या मनात भावी यादवी विनाशाचे दुःखही व चिंता उमटली. तेच दुःख-तीच दुविधा उराशी बाळगत त्यांच्यावर छत्र-चामरे ढाळत सुभद्रा व भानुमती त्यांच्यामागेच येत होत्या.

सर्वप्रथम युधिष्ठिर व पांचाली अभिषिक्त कुंडात आसनस्थ झाले. त्यानंतर दशग्रंथी पुरोहितांनी त्या उभयंताच्या मस्तकावर दुग्ध, जल, सुगंधित तेल, स्वर्णमुद्रा व पुष्पांच्या दलांचा अभिषेक केला. अभिषेकानंतर त्या उभयतांनी कुंडामध्ये कुमकुम, कृष्णागरू, समिधा, धान्य, वस्त्रांचा उपखंड व दुग्धाची आहुती दिली.

तत्क्षणी वेदमंत्रांचे प्रस्फुट उच्चारण झाले.

पुरोहितांच्या त्या प्रस्फुट उच्चारणानंतर पांचालीसह सर्व पांडवांनी त्या मंत्राचे उच्चारण केले, अन सम्राट पदाच्या- समाज्ञी पदाची कर्तव्य पूर्ण करण्याचा संकल्प ग्रहण केला, दर्वीच्या साहाय्याने ताम्रपत्रात त्यांनी अर्घ्यदानही केले. अर्घ्यदानानंतर पांडव-पांचालीने 'उपनीयमान'चे पूजन करण्याचे निश्चित केले. पूर्वीच्या राजसूय यज्ञा प्रमाणेच पांडवांनी पांचालीसह उपनीयमान म्हणून श्रीकृष्णाचे पूजन केले. त्यानंतर नवग्रह, अष्टदिशांचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर ऋग्विज पूजन, नृप पूजन आदि पूजन पांडव- पांचालीने केले. पूजनानंतर त्यांनी ब्राह्मणांना स्वर्णमुद्रा, व समिधा, क्षत्रियांना शस्त्रात्रे, वैश्यांना अलंकार तसेच शूद्रांना धान्य दान केले.

अभिदानाच्या विधीनंतर युधिष्ठिर - द्रौपदी पुन्हा वेदीवर आसनस्थ झाले. व्यास मुनींनी युधिष्ठिराच्या मस्तकांवर

मुकुट अन कंठात शुभलक्ष्मी माला परिधारण केली, तर व्यासपत्नी घृताचीनेही पांचालीच्या मस्तकावर चुडामणी-किरीट व कंठात विविध रंगाच्या कमळांची माला परिधारण केली. त्यानंतर युधिष्ठिराने सर्वप्रथम राजवस्त्र लपेटून घेत स्वर्णिम मुठीची तलवार, राजदंड व राजपत्र ग्रहण केले. पांचालीनेही त्याचे अनुकरण करत राजदंड, राजपत्र आणि समृद्धीचे प्रतीक असलेला कलश धारण केले. अशा तऱ्हेने त्या उभयंता सम्राट- सम्राज्ञीने आपापली राजपदाची दायित्वे, कर्तव्यधर्म व नियत कर्मांचे निर्वहन करण्याचे वचन ग्रहण केले.

त्यानंतर पांडुपुत्रांनी व पांचालीने धृतराष्ट्र -गांधारी, कुंती, विदुर, वसुदेव, रोहिणीदेवी व संजय आदि ज्येष्ठांचे आणि यादव श्रेष्ठींचेही चरण शिवले. त्या सर्व ज्येष्ठांनी दुःखाचित्तानेच आशीर्वाद दिला, “चिरं जीवत:! सम्राट-सम्राज्ञीची राजकार्यांचे - कर्तव्याचे निर्वहण करा, उत्तम रीतीने /न्याय्य रीतीने!”

धृतराष्ट्र- गांधारीला आशीर्वाद देण्याची कदापि इच्छा देखील नव्हती. मात्र विवशतेने त्यांनीही म्हटले, “कल्याणमस्तु!”

कुंतीला वाटलं, तिचे स्वप्न आज जरी पूर्णत्वास गेले असले, तरी हे स्वप्न पूर्ण झाले आहे, तेही पूर्ण बलिदान ग्रहण करूनच. हा यज्ञ (नरमेध) पूर्ण झाला आहे, तेही पूर्णतः आहुती घेऊनच आणि या राज्याभिषेकानंतर जेते राजे असूनही पांडवाच्या- पांचालीच्या हातात राख व त्याही अवस्थेत कर्तव्याचा राजदंड आलेला आहे. कुंतीने असा विचार केला, तरीही तिने आपल्या पाचही पुत्रांना व स्नुषणेला आशीर्वाद दिला, “आयुष्यमान भव! अखंड सौभाग्यवती भव!” दिग्विजयी भव!” कुंतीच्या स्वरात दुःख असले तरी, विश्वासाचे ओजं होतं. तिला याचाच विश्वास होता की कि हस्तिनापुर उजाड माळरान असलं तरी, पांडव- पांचाली या नगरीचे निश्चितच पुनर्जीवन करतील. तिने विश्वासाने आपल्या पुत्रांच्या आणि स्नुषणेच्या मस्तकावर

हात ठेवला. मात्र तिच्या स्पर्शातून जाणवणारी आश्वस्तता पांडवांच्या- पांचालीच्या आणि स्वतः आशिष देणाऱ्या कुंतीच्याही मनातली उमटणारी वादळ शांत करू शकत नव्हती. त्या सर्वांच्या मनात गढूळणारी अस्वस्थता व चिंता अविरतच होती. त्यात दायित्वाचा भार, त्याचे या स्थितीतही वहन करणे यथार्थात कठीण होतं.

तरीही कर्तव्याचे निर्वाहिण हे सर्वोपरी असते, म्हणून पांडवांनी आपल्या ज्येष्ठ पत्नीसह- पांचालीसह आपल्या मनातील वादळे दूर सारत संपूर्ण राज्याचे निरीक्षण तसेच प्रजाजनांना स्वर्णिम मुद्रांचे दान करण्यासाठी रथातून संपूर्ण राज्यात अभिभ्रमण करण्याचे निश्चित केले. तसे दारुक व इंद्रसेन पांडवांकरिता रथ सज्ज करण्याकरिता उपस्थित झाले. किंतु पांडवांनी इंद्रसेनालाच रथ सज्ज करण्याचा आदेश दिला.

त्यांनी रथातून अभिभ्रमण केले व प्रजाजनांना दाने केली. मात्र इंद्रप्रस्थाच्या पूर्वीच्या राजसूय यज्ञाप्रमाणे प्रजाजनाच्या मुखावर काडीमात्र आनंद नव्हता, प्रसन्नता नव्हती. उलट त्यांच्या मनातील सर्वनाशाचे दुःख त्यांच्या नेत्रांत उमटून आले होते. त्यांचे दुःख पाहून पांचाली-पांडुपुत्र समानुभूतित झाले. मात्र त्या सर्वांचे सांत्वन करण्याचे शब्द आता पांडुपुत्रांकडे नव्हते.

किंतु दुःखाचे समत्व पाहून (दुःखद परिस्थितीत) दुःख अधिकतम गहिरे होण्याची संभाव्यता वाढते. यावेळी प्रजाजनांनी विभिन्न प्रश्न केले नाही अथवा पाडवांना दोषही दिला नाही. मात्र त्यांचे नेत्र मूक नव्हते. त्याच्या नेत्रांत प्रश्नचिन्हे उमटलेली होती. म्हणूनच पांडवांचे नेत्र त्या प्रश्नांना उत्तरं देता येत नसल्याकारणे बव्हंशी झुकलेले होते. त्यांच्या कर्णपटलावर-मनपटलावर वारंवार दुर्योधनाचे (मृत्युवेळेचे) शब्द आदळत होते.

“पांडवहो, तुम्ही क्षीणवप्रा पृथ्वीचा उपभोग घ्या आणि प्रजाजनांचेही शापही प्राप्त करा. आयुष्यभर दुःख भोगले, तसे आताही युध्द करुनही – आपले अधिकारजनित राज्य प्राप्त करुनही दुःख ग्रहण करा. पूर्वी तुम्ही नागांवर राज्य केले होते, आता मात्र तुम्ही विधवा व अनाथ बालकांवर राज्य करा. मात्र जरा विचार करा की जरी तुम्ही सर्वांनी आपल्या प्रतापाने-कृष्णाच्या कूटनीतीने युध्द जिंकले, तरी तुमचा सत्यार्थाने विजय झाला आहे? की नाही?”

पांडवा्च्या मनात हाच प्रश्न उमटला, परंतु या प्रश्नांचे उत्तर नव्हते, आणि उत्तर असले तरी, तरी ते उत्तर शोधण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. कारण ते उत्तर निराशेच्या गर्तेत लोटून देणारे होते. हे पांडुपुत्रांना ज्ञात होते आणि त्यांचे उत्तरही.

रथाच्या अभिभ्रमणानंतर पांडव पांचालीसह ज्याक्षणी अंत:पुरात प्रवेशले, त्याक्षणी त्यांच्या अन्य स्त्रियांनी पुत्रशोकात आपल्या कक्षात स्वतःला कोंडून घेतले आहे, असे त्यांना दिसले.

ते सर्वजण अत्यंत चिंताक्रांत झाले. युधिष्ठिराने देविका-पौरवीच्या कक्षाची द्वारे ठोठवायला आरंभ केला. भीमसेन कालीच्या कक्षाचे द्वार तोडू लागला. अर्जुनाने उलूपीच्या कक्षाच्या द्वाराचे बध्दक क्षुरप बाणाच्या साहाय्याने काढण्याचे प्रयत्न केले. तसेच नकुलाने आपल्या तलवारीच्या अणचुकीदार टोकाने करेणुमतीच्या, सुव्रतेच्या

कक्षाच्या द्वारामध्ये खाच निर्माण केली. मात्र सहदेवाने संयमाने कार्य ग्रहण केले. त्याने विजया, ऋतावरी, ज्योतिष्मती या आपल्या राण्यांना अंतःपुरातच राहू दिले. त्यांच्या कक्षाचे द्वार ठोठावले नाही.

"सहदेवा, तू अंतःपुराचे (तुझ्या) द्वार का खटखटवले नाहीत?" नकुलाचा प्रश्न.

यदि माझ्या प्रियतमा- विजया, ऋतावरी, जोतिष्मती दुःखी-शोकमग्न असतील, तर त्यांना मनमुक्तपणे शोक करु द्यायला हवा. तरच त्यांचे दुःख हलके होईल, नकुला! म्हणून, अन्य पांडवहो! आपले प्रयत्न थांबवा, कारण पांडवस्त्रिया शांत झाल्याशिवाय आपण त्यांचे सांत्वन करु शकत नाही." सहदेवाच्या शब्दांवर अन्य पांडवांनी सहमती दर्शवली अन् आपले प्रयास थांबविले.

तत्क्षणी पांचालीने म्हटले, "मी माझ्या भगिनींचे सांत्वन करेन."

तिच्या शब्दांना अनुमोदन देत स्वयं पुत्रशोकाकारणे दुःखी असलेल्या सुभद्रा, बलंधरा तसेच निपुत्रिक भानुमतीदेखील (सहदेवपत्नी आहे, दुर्योधन पत्नी नव्हे) तिच्या समीप आल्या.

"देवी, आम्हीदेखील आमच्या सपत्नींचे सांत्वन करु, तुमच्यासह." तिघींचे एकसुरात शब्द उमटले.

"इदमस्तु!" युधिष्ठिराने म्हटले, "काही समयानंतर तुम्ही चौघी जणींनी अन्य पांडवस्त्रियांचे सांत्वन करावे."

"आणि उत्तरा-परीक्षित स्वस्थ तर आहेत ना?" भीमसेनाने या घडीला महत्वपूर्ण प्रश्न विचारला.

"मी वैद्यराजांना संदेश धाडलेला आहे. तेच उत्तरा अन् परीक्षिताच्या स्वास्थाची वार्ता देतील." नकुलाने म्हटले.

"अवश्य." अर्जुनाने म्हटले.

काही समय पांडवांनी प्रतीक्षा केली, आणि पांचाली, सुभद्रा, बलंधरा तसेच सहदेव पत्नी भानुमतीला अंत:पुरात अन्य स्त्रियांचे सांत्वन करण्याकरिता पाठवले.

देविका, पौरवी, काली, उलूपी, करेणुमती, विजया, ऋतावरी आदि स्त्रिंया विलाप करत होत्या, अजूनही.

मात्र द्रौपदीला पाहून त्या सर्व पांडववधू सावध झाल्या अन् त्यांनी त्वरित शोक करणे थांबवले. तसा द्रौपदीने पौरवीच्या स्कंधावर हात ठेवून म्हटले, “मनमुक्तपणे विलाप करा, जेणेकरून तुम्हां सर्वांचे मन हलके होईल.”

“आता कसलं मन हलके होणार? उलट दुःख अधिक त्रस्त करु लागले आहे.” पौरवीने दुःख मिश्रित क्रोधाने म्हटले.

“पौरवी! उचितच म्हणतेस तू. पांचालीच्या आगमनाने दुःखाचे ‘वार्धक्य’ झाले आहे.” देविकेचे शब्द पांचालीच्या मनाला बोचले.

“पौरवी! असं बोलू नकोस.” सुभद्रा म्हणाली.

“तुझ्या शब्दांनी पूर्वीच दुःखी असलेल्या देवी पांचाली अत्याधिक दुःखी होतील, देविका!” बलंधरेने म्हटले.

“मात्र आमचं काय! आम्ही किती दुःखी आहोत! आम्हांला पुत्रवियोगाचे दुःख भेडसावत आहे. याशिवाय आमच्या पुत्रवधूही विधवा झाल्या आहेत, त्यांचेही वैषम्य मनात दाटलेले आहे.” राजकुमारी कालीने म्हटले.

“परंतु माझा तर वंशविश्चेद झाला आहे!” पांचालीने उद्वगाने म्हटले. मात्र तिने क्षणार्धात स्वतःच्या भावनांवर नियंत्रण प्राप्त केले.

“किंतु हे महायुद्ध कुणाकारणे घडले?” करेणुमतीने विचारले.

“भानुमतीने-(दुर्योधन पत्नी) जे म्हटले ते सत्यच आहे.” विजया स्पष्टत: म्हणाली नाही, कारण ती ज्येष्ठ पांडवस्त्री नव्हती. म्हणून तिने अप्रत्यक्षपणे द्रौपदीकडे संकेत केला की

पांचालीच या महायुध्दाकरिता दोषी आहे, हेच दर्शीविण्याकरिता.

“देवी, यदाकदाचित आपण देवरश्री श्रीकृष्णांना शांती प्रस्तावावेळी असं म्हणाला नसता की, हा शांती प्रस्ताव नसेल, तर हा युध्द बिगुल आहे, तर हे युध्दच घडले नसते.” ऋतावरीने भीतभीतच म्हटले.

असे ऋतावरीचे शब्द ऐकून द्रौपदीला खेद वाटला, मात्र तिने ऋतावरीच्या स्कंधावर हात ठेवून म्हटले, “ऋतावरी, तुझ्या शब्दांचा आशय अन्य स्त्रियांप्रमाणेच आहे. मात्र तुला हे जाणवले नाही की प्रत्येकच घटना मनुष्याच्या इच्छेनुरुप घडत नसते, त्याच्या अपेक्षेनुसार घडत नसते. नियतीच्या चक्रानुरुप या घटना घडत असतात, कनिष्ठे!” यावर ऋतावरी मूक राहिली.

“मात्र भानुमतीचा आरोप असत्य आहेत, असे कशावरुन म्हणता येईल?” पौरवीच्या गूढार्थाने द्रौपदीवर सांकेतिक आरोप.

पुनः तोच आरोप ऐकून सुभ्रदेने म्हटले, “वारंवार तू देवी पांचालीवर का आरोप करते आहेस, पौरवी?”

“कारण आम्ही दुःखी आहोत, विषण्ण आहोत.” सुव्रतेने अश्रू ढाळत म्हटले.

“त्याकारणेच आज आमचा तोल ढळला आहे. आम्ही आमच्या शब्दांवरचे नियंत्रण गमावले आहे.” तिच्या जुळया भगिनीने- ज्योतिष्मतीने म्हटले.

“कृपया, आम्हाला समजून घे.”ऋतावरीने द्रौपदीला म्हटले, “ज्येष्ठ भगिनी! आमची स्थिती अजूनही शोकनिमग्न आहे.”

“तर देवी पांचालीला कोण समजून घेणार? तुम्ही सर्वजणीही कौरवस्त्रियांप्रमाणेच तिला समजून न घेता,

तिलाच दोष देताहात, हे उचित नव्हे.” बलंधरेने रोषाने म्हटले.

“बलंधरे, सुभद्रे, भानुमती! तुम्ही तिघींजणी अन्य पांडव स्त्रियांचे सांत्वन करा. मी काही क्षणांकरिता प्रदोषस्थानी गमन करते.”

असे म्हणून पांचालीने अंत:पुराचे द्वार लावून प्रदोषस्थानी प्रस्थान केले.

हे परम विधात्या! हे माझ्या जीवनात काय घडत आहे? कर्णवधाच्या शोकात पांडवांनी मला आणि राजमाता कुंती देवीला या महायुद्धाचा दोष दिला. त्यानंतर कौरवस्त्रियांनीही तसेच सैनिकांच्या विधवांनीही आपल्याला दोषी ठरवले. आणि आता पांडव स्त्रियांनीही त्यांच्याच आरोपाचे अप्रत्यक्षपणे अनुमोदन केले. (समर्थन)

जणू आपले वस्त्रहरण घडले, यातच आपला खरा दोष होता! आपण स्वतःचे स्त्रीत्व, सत्त्व, आत्मसन्मान, स्वत्व

तसेच प्रतिष्ठा राखण्याकरिता आपले केश मोकळे सोडले, तो आपला अपराध होता का?

हे युध्द जर विध्वंसकारी आहे तर तो अपमान- ती विटंबना आपल्याकरिता आपले जीवन, सर्वस्व, परिणित नाते, त्यातील विश्वास, प्रेम व निष्ठा, ध्वस्त करणारी नव्हती का?

पांचालीच्या नेत्रातून अश्रु उमटले.तत्क्षणी पाचही पांडव प्रदोषस्थानात प्रवेशले.

“कल्याणी अन्य स्त्रियांचे सांत्वन तू केलेस का? युधिष्ठिराचा प्रश्न.

भीमाने तिचे अश्रू पुसत म्हटले, “काय झाले पांचाली?” अर्जुनाने भीमाला विचारले, “पांचालीने अन्य स्त्रियांच्या सांत्वनार्थ अंतःपुरात प्रयाण केले होते, मात्र असे काय घडले की पांचालीलाच सांत्वनांची आवश्यकता पडली आहे?”

“नीलांगिनी, सत्य सांग नेमके काय घडले अंत:पुरात?” नकुलाने शंका विचारली.

“इतके प्रश्न विचारू नका. तिला जरा स्वस्थता लाभू द्या.” सहदेवाने म्हटले.

पांचाली काही क्षण शांत राहिली. त्यानंतर आपले मुख पदराने पुसत (स्वेदयुक्त) तिने म्हटले, “काही नाही, तुमच्याप्रमाणेच तुमच्या अन्य स्त्रियांनी मनोमन मलाच या महायुद्धाकरिता दोषी मानले आहे. मी पांडवाची पट्टराज्ञी असल्याकारणाने त्या प्रत्यक्षपणे बोलत नाहीत. मात्र ते अप्रत्यक्षपणे मलाच दोष देताहेत. त्याकारणे काहीसे वैषम्य वाटले.”

पांचालीने कोणताही आडपडदा न ठेवता सर्व काही सांकेतिक रीतीने सांगितले.

तिचे क्रोधयुक्त वैषम्य पाहून त्यांना सर्व काही समजलेही. युधिष्ठिराने पांचालीला सांत्वन देत म्हटले, “तूझे

मन विशाल आहे. तू अन्य पांडव स्त्रियांना क्षमा कर. कारण अखेर त्या तुझ्याच भगिनी, सपत्नी आहेत. त्याकारणे त्यांचे कठोर शब्द अथवा आरोप तू मनावर न घेणे श्रेयस्कर ठरेल, कल्याणी!": युधिष्ठिराचे शब्द ऐकून पांचालीने स्वतःला सावरले.

"मला कौरव स्त्रियांचे आरोप मला इतके दुःखदायक वाटले नाही, जितकी मला पीडा पांडव स्त्रियांचे आरोप ऐकून वाटले." पांचालीने म्हटले, "खरं दुःख त्यावेळी वाटलं, ज्याक्षणी आपण सर्वांनी राजमातेला अन् मला दोष दिला होता."

तिचे हे शब्द ऐकून सर्व पांडवांना पश्चात्ताप व दुसऱ्यांदा चूक करताक्षणीची जाणीव वाटू लागली.

ते सर्वजण गंभीर, नि:शब्द झाले. त्यांच्याकडे कुठलेही स्पष्टीकरण नव्हते.

मात्र भीमसेनाने म्हटले, "आम्हांला ज्ञात आहे की आम्ही अयोग्य आचरण केलं. मात्र त्या क्षणी दु:खाकारणे आमचे भावनांवरील व शब्दांवरील नियंत्रण नष्ट झाले होते. आम्हाला स्वतःला सावरणे कठीण झाले होते, त्याकारणेच आम्ही तुला अन् मातेला दोष दिला."

"खरोखरच युधिष्ठिराने संपूर्ण स्त्रीजातीलाच शाप देणे अनुचित होते." सहदेवाने म्हटले, "पांचाली, हे निश्चित होते. (अक्षम्य)

"मात्र आम्ही आता स्वतःला सावरले आहे आणि आम्ही स्वतःच्या स्त्रियांनाही सावरू शकतो."अर्जुनाने धैर्य साधत म्हटले, "पांचाली, चिंता करू नकोस, आम्ही सर्वजण पांडवस्त्रियांच्या मनातील तुझ्याविषयीच्या निश्चित पूर्व ग्रहाचे निवारण करू.

"मात्र हे वचन नव्हे, हे लक्षात ठेव. नीलांगिनी, कारण कुणाचाही आपण उत्तम प्रकारे आशंका निवारणाचा प्रयास

करू शकतो, मात्र एखाद्याचे मतपरिवर्तन तेव्हाच होऊ शकते, ज्याक्षणी त्या व्यक्तीची प्रबळ इच्छा असते.” नकुलाने म्हटले.

“नकुलाचे शब्द उचित आहेत. मात्र तू सर्वप्रथम स्वतःला सावर.” सहदेवाने द्रौपदीला धीर दिला, “आम्ही आपल्या परीने प्रयत्न करू. ते प्रयत्न सफल ठरले तर उत्तमच.”

“आपण चिंता करू नका. अन्य पांडव स्त्रियांच्या मनातील पूर्वग्रह निश्चितच निवळेल. कारण हृदयाच्या आघातावर काळ हे औषध असते.” द्रौपदीने म्हटले, “आर्य, आपण सर्वांनी पांडवस्त्रियांचे अवश्य सांत्वन केले पाहिजे.”

द्रौपदी आपल्या कक्षात विश्राम करत होती. तत्क्षणी सुभद्रा तिच्या कक्षात प्रवेशली, "प्रणाम, ज्येष्ठ भगिनी!"

"सुभद्रे!" द्रौपदी उठून बसली, "उत्तरा व परीक्षित स्वस्थ आहेत ना?"

"देवी, ते स्वस्थच आहेत, मात्र माझे बंलधरेचे अथवा भानुमतीचे प्रयास विफल ठरले, अन्य पांडवस्त्रियांस समजाविण्याचे. पांडव आता त्याकरिताच प्रयास करत आहेत, त्यांचे प्रयत्न सफल ठरोत." सुभद्रेने म्हटले. त्याचवेळी एका दासीने येऊन म्हटले, अंगराज्ञी वृषाली आपल्या पुत्रांसह वृषकेतुसह आपणांसह वार्तालाप करणार

आहेत. कारण त्या दुसऱ्याच दिवशी अंगदेश प्रस्थान करणार आहेस.”

“काय?” द्रौपदी अचंबित झाली. तिने दासीला अनुज्ञा दिली, “वृषालीला कक्षात येऊ दे.”

तशी वृषाली द्रौपदीच्या कक्षात प्रवेशली. तिच्यासह वृषकेतुही होता. वृषालीच्या निर्देशांनुरूप वृषकेतुने पांचालीचे चरण शिवले. तसा द्रौपदीने आशीर्वाद दिला, “पुत्रा, वृषकेतु! ओजवंत भव! कीर्तिवान भव!”

त्यानंतर वृषकेतुने सुभद्राचेही चरण शिवले. किंतु सुभद्रा त्याला आशीर्वाद देऊ शकली नाही. कारण त्याच्या पित्याने तिच्या पुत्राची हत्या केली होती. म्हणून ती वृषकेतुला इतकाच आशीर्वाद देऊ शकली “कल्याण होवो!”

त्यावेळी वृषालीने म्हटले, “पांचाली! मला तुझ्याशी एकांतात बोलायचे आहे. मात्र ते सुभद्रेसमोर व वृषकेतु समोर बोलणे शक्य नाही.”

त्याकारणे द्रौपदीने सुभद्रेला म्हटले,"सुभद्रे, तू वृषकेतुला घेऊन अन्य कक्षात प्रस्थान कर. मी आणि वृषाली एकमेकांशी वार्तालाप करणार आहोत."

हे ऐकून सुभद्रा काहीशी शंकित झाली. तिच्या मनात विचार आला वृषाली पांचाली भगिनीवर आरोप तर नाही ना लावणार ना अथवा काही विचित्र प्रश्न केले तर.........

तिने वृषालीला म्हटले वृषाली, द्रौपदी देवींना तू निष्कारणच प्रश्न करू नकोस."

यावर वृषालीने मान डोलावली. त्यानंतर सुभद्रेने वृषकेतुला घेऊन इतर कक्षात प्रस्थान केले. पांचालीने मंचकावर हात ठेवत म्हटले, "वृषाली, माझ्याजवळ मंचकावर आसनस्थ हो."

वृषाली तिच्याजवळ आसनस्थ झाली, मंचकावर. तसे तिने विचारले, "वृषाली, तू का अंगदेशाला प्रस्थान करू

इच्छित आहेस? आमच्या आतिथ्यात काही कमतरता तर नाही राहिली ना?"

"नाही, पांचाली, तसे नव्हे, मी याच कारणासाठी अंग देशात प्रस्थान करणार आहे की अंगराज्य हे माझे पतीगृह आहे. याशिवाय हस्तिनापूर हे आता माझे शत्रुगृह आहे." वृषालीने स्पष्टपणे म्हटले, "म्हणून......

हे ऐकून द्रौपदी विचारांत पडली. वृषालीला जे वाटतं होतं, त्यात अनुचित असे (काहीच) नव्हते. द्रौपदीला वाटलं, ज्याक्षणी ती स्वतः कुलवधू व नववधू म्हणून पांडवासह हस्तिनापुरात प्रवेशली आणि आतासुद्धा एक महाराणी म्हणून प्रवेशली होती. त्याक्षणीही हस्तिनापुर तिला शत्रुगृह वाटले होते. सर्वप्रथम विवाहानंतर तिला हस्तिनापुरांतून इंद्रप्रस्थास प्रस्थान करुन नूतन समृद्ध जीवन जगण्याचा पर्याय होता, मात्र आता या स्मशानतच जगण्यावाचून पर्याय नव्हता.

“ म्हणून मी तुला आग्रह करणार नाही. मात्र काय झालं? तुला माझ्याशी काय एकांतात बोलायचे होते, वृषाली?” द्रौपदीने विचारले.

हे ऐकून वृषालीने सर्वप्रथम हात जोडले. पांचालीने आश्चर्याने प्रश्न केला, “हे काय?”

“मी माझ्या पतीच्या वतीने मी तुझी क्षमा मागते आहे. त्यांनी हस्तिनापूरच्या द्युत सभेत तुझ्या चारित्र्यावर लांछने लावली, तुझी अपरिमित निंदा केली, व तुझे वस्त्रहरण करण्याची आज्ञा दिली. म्हणून ही क्षमा……” वृषालीच्या शब्दांत पश्चाताप होता.

तिच्या शब्दांकारणे पांचलीला त्याच घटनांचे पुन्हा स्मरण झाले. तिच्या मनात उद्वेग निर्माण झाला असला, तरी तिने स्वतःला सावरले. तिने काहीच स्पष्ट व कठोर स्वरात म्हटले, “इतरांच्या/ अन्याच्या अपराधांची क्षमा मागण्याचा अधिकार तुला नव्हे आणि कर्तव्य नाही. कारण इतरांच्या

अपराधाची आत्मग्लानी वा पश्चाताप स्वतःवर ओढवून घेणे हे फक्त अविवेकाचे व अप्रज्ञातेचे लक्षणच नव्हे, तर स्वतःवरच अन्याय करण्यासारखेही असते. त्याकारणे कर्णाच्या पातकांकरिता तू क्षमा मागू नकोस व स्वतःही ग्लांत होऊ नकोस.”

यावर वृषालीने काहीच म्हटले नाही. ती विचार निमग्न झाली. तिने म्हटले, “पांचाली, तू म्हणतेस ते उचित आहे. किंतु जे काही घडले त्याविषयी माझ्या मनात वैषम्यही आहे व पश्चातापही. मला ज्ञात आहे, यात माझा दोष नव्हे. मात्र ते कृत्य माझ्या पतीने केले होते. ते शब्द माझ्या पतीने उच्चारले, हे माझ्याकरिता अत्यंत लज्जास्पद आहे.”

“मला ज्ञात आहे, तुझ्याकरिता ते लज्जास्पद आहे. ज्याप्रमाणे माझ्या पतींनी दर्शवलेले धर्म कार्पण्य (द्युतसभेत) माझ्याकरिता लज्जास्पद व पीडादायक होते. मात्र त्याविषयी मी स्वतःला दोष देत नाही अथवा मनात

पश्चाताप बाळगत नाही. मात्र तुला अथवा मला एक रुखरुख वाटणे स्वाभाविक आहे. हे सर्व घडले नसते तर किती पथ्यकर ठरले असते!” द्रौपदीने निराशेने निश्वास टाकला आणि वृषालीच्या स्कंधावर हात ठेवला,”वृषाली तसे म्हणजे आपण आता या विषयावर चर्चा करणे निरर्थक आहे. कारण त्याक्षणी कर्णाने आपल्या विवेकाचा उपयोग करावयास पाहिजे होता.”

“पांचाली, तू उचित म्हटलेस. मात्र मला अजून एक सांगायचे आहे, ज्याक्षणी अंगराज तुझ्या स्वयंवरात सहभागी झाले होते. त्याक्षणी मला तुझ्याबद्दल ईर्ष्या वाटली होती, कारण तू गुणवती, रूपवती, शीलवती आहेस. तुला शस्त्र व शास्त्रांचेही ज्ञान आहे. तुला विभिन्न कला- विद्यांचे प्राविण्य प्राप्त आहे, त्याकारणे अंगराजही तुझ्याकडे आकर्षित झाले होते.” वृषालीने म्हटले.

“ईर्ष्या? कौरव-पांडव संघर्ष पाहिल्यानंतर ईर्ष्येची भीषणता मला कळाली.”

पांचाली पुनः मंचकावर आसनस्थ झाली,” मला ज्ञात आहे, माझ्या सौंदर्याचे, गुणांचे, कलांचे सर्व राजा-राजपुत्रांना आकर्षण होते, त्याकारणे ज्याक्षणी ब्राह्मण पुत्राच्या वेषातील राजकुमार अर्जुनांनी पण जिंकला, त्याक्षणी प्रत्येक क्षत्रियाने युध्दाकरिता त्यांना आव्हान दिले गेले. आणि याच सौंदर्याकारणे माझे पंचपांडवांत......” असे म्हणून तिने आपला अधर दातांखाली दाबला. मात्र तिच्या मनातील भावना जाणवून वृषालीने दु:खातिशयाने म्हटले, “विभाजन झाले, त्यानंतरच माझ्या हृदयातील ईर्ष्या घटली, मात्र तुला चक्रवर्ती सम्राज्ञीच्या सिंहासनावर आसनस्थ पाहून तर ईर्ष्या जागृत झाली. किंतु वस्त्रहरणानंतर त्या ईर्ष्येची स्थान पश्चात्तापाने घेतले. मला क्षमा करशील या ईर्ष्येविषयी!” तिच्या स्वरात पांचालीविषयी आदर व पश्चात्ताप होता.

"मी तुला क्षमा केले आहे, या ईर्ष्येकरिता!" पांचालीने तिच्या स्कंधास थोपाटले. "आता तरी तुझ्या हृदयातील अनुताप शमेल ना? तू ग्लांत होऊ नकोस. जे काही घडले, ते नियतीची योजना होती व ते अघटीत घटीत घडणे, अटळच होते. जे अटळ असते, त्या बाबतीत विदुषी सत्वशील- प्रतिवता स्त्रिया कधीच शोक करत नाहीत."

हे ऐकून वृषालीने पांचालीला प्रणाम केला, तिच्या व्यक्तिमत्वाकारणे प्रभावित होऊन. "कृष्णे, मी तुझ्याविषयी जितकं ऐकलं, त्याहून अधिक तुझ्यामध्ये समाहित आहे. पांचाली तू (फक्त) विदुषी, बुद्धिमतीच नव्हे तर तू विवेकशीलही आहेस. तू मला अपराधाच्या आत्मग्लानीतून व पश्चातापातून मुक्त केलेस, पांचाली."

"प्रणाम का करतेस, वृषाली? आपण दोघी तर समवयस्क आहोत. याशिवाय तू माझ्या पतीच्या ज्येष्ठ भ्रात्याची- कर्णाचीही पत्नी आहेस."

“पांचाली, तू मला क्षमा केलेस. तू माझ्या पतीला क्षमा करावेस, हा माझा आग्रह नाही. कारण माझ्या पतीने केलेला अपराध क्षम्य नव्हतेच. मी देखील त्याला क्षमा करू शकले नाही. मी तुझी मनोदशा निश्चितच जाणते आहे.” वृषालीने समजूतदारपणे म्हटले, “द्रौपदी तू नियमितपणे मला पत्रे पाठवत जा, मी देखील तुझ्यासह संपर्क साधत जाईन. आता तू मला अनुमती दे.”

“तुला अनुमतीची आवश्यकता नाही, वृषाली! आणि हे लक्षात ठेव, इतरांनी केलेल्या अपराधांचा भार वाहण्याकरिता तू बाध्य नव्हेस. अशाप्रकारे तू स्वतःवर अन्याय करूनही नकोस.” पांचालीने वृषालीला आलिंगन देत म्हटले, “तुझ्या अन्य पुत्रांचा वध झाला असला तरी, तुझा एक पुत्र जिवित आहे. त्याचे तू उत्तम संगोपन कर. तू त्याला असे संस्कार त्याला दे की तो सदाचारी व प्रजाहितदक्ष राजा होईल.”

“अवश्य.” वृषालीने म्हटले, “मी आता प्रस्थान केले पाहिजे.”

“वृषाली, मी सेवकांना तुझा रथ सज्ज करण्याची आज्ञा देते.” पांचालीने म्हटले.

“त्याची आवश्यकता नाही. मी स्वतःच्या सारथ्याला अनुज्ञा देऊन माझा आणि वृषकेतुचा रथ सज्ज केलेला आहे. तू चिंता करु नकोस. मी अंगराजांच्या अपराधाकरिता स्वतःला कधीच दोष देणार नाही. याशिवाय मी वृषकेतुला उत्तम संस्कार देईन, जेणेकरून तो नीतीमत्तेचे पालन करेल.”

“प्रणाम.” द्रौपदीने म्हटले, तसा वृषालीनेही तिला प्रतिप्रणाम केला व प्रस्थान केले.

**चं**द्र आकाशात मेघांतून अर्धवट डोकावत होता. नक्षत्रांची गती अश्वासमान होती आणि द्रौपदीला निद्रा येत नव्हती.

ती एक सारखी कुशी बदलत होती. मात्र ती ज्याक्षणी अत्यंत अस्वस्थ झाली, त्याक्षणी ती उठून बसली. तिला वाटले, युधिष्ठिराशी काहीसे बोलून स्वतःला शांत करावे.

मात्र तिला दिसले, दुसऱ्या मंचकावर युधिष्ठिर कधीच निद्रिस्त झाला होता. हे पाहून तिच्या मुखावर औपरोधिक हास्य उमटले. आपले ऐश्वर्य, मानसन्मान, साम्राज्य व

प्रतिष्ठा द्युताच्या पटावर गमावल्यानंतरही धर्मराज असेच स्वस्थतेने निद्रिस्त झाले होते.

ती उठून सौंधात गमित झाली. सौंधात कृष्ण येरझारा घालत होता. तो द्रौपदीला पाहून चकित झाला.

"सखे, तू सौंधात?"

"केशवा, मला निद्रा येत नव्हती, मी काहीशी अस्वस्थ झाले होते, त्याकारणे सौंधात मी प्रयाण केले." पांचालीने म्हटले.

"कृष्णे, मात्र धर्मराज निद्रिस्त झाला आहे का?" कृष्णाने विचारले.

द्रौपदी:- "कृष्णा? त्यांना निद्रा येणारच, नाही का? आपले ऐश्वर्य, प्रतिष्ठा, मानसन्मान, साम्राज्य गमावल्यानंतरही त्यांनाही अशीच निद्रा आली होती." द्रौपदीने आपल्या पतीच्या औदासिनतेविषयी कृष्णाला कथन केले. त्याक्षणी ती अस्वस्थता, वैषम्य व क्रोध या

भावतत्रयींमध्ये होती. या चेतापदिशावस्थेत एकच कृष्ण होता, जो या अवस्थेतही तिला मार्गदर्शन करू शकत होता. मात्र तोही मूक होता. त्याने काही क्षणाने म्हटले, “सखी मी बोलत नाही, याचा अर्थ असा नव्हे की मला तुझे दुःख दिसत नाही. मीही व्यथित आहे तुझे दुःख पाहून.” श्रीकृष्णाने दुःखी होत म्हटले.

“मी दुःखी आहे, कौरवस्त्रियांनी आणि पांडवस्त्रियांनी दिलेल्या दूषणांकारणे. मात्र सुभद्रा, सावित्री, बलंधरा व सविता सहदेव पत्नी भानुमती, वृषालीने मला समजून घेतले, माझा भावना समजून घेतल्या, हेही तितकेच खरं. म्हणजेच मनुष्याला त्याच्या दुःखद काळात कोणी ना कोणी समजून घेतच केशवा!” पांचालीने सकारात्मक म्हटले.

“आणि मी? समजून घेतो का तुला!” कृष्णाचा त्याक्षणी निरर्थक वाटणारा प्रश्न.

प्रश्नावर पांचाली काही क्षण निरुत्तरच झाली. गंभीर शांततेवर हास्याचा वार करत तिने कृष्णाच्या स्कंधावर हात म्हटले, “कृष्णा, मुळीच नाही. तू मला समजून घेतलं नव्हतं कधी. तिने असे स्वतःच्या मनातील व परिवेशातील तणाव अल्प करण्यासाठी म्हटले होते.

“अस्स! तूही मला समजून कधी घेतलेस?” कृष्णाने हसत म्हटले. त्यानेही तिच्या ताण निवारक शब्दांस उत्तम प्रतिसाद दिला. त्यानंतर त्याने शांतपणे तिला म्हटले, “कृष्णे, सत्य आहे की या विपदेच्या काळात आणि त्यापूर्वीच्या राजसूयाच्या यज्ञाच्या कार्यरत काळातही आपण एकमेकांना समयदान प्रदान करू शकलो नाही. खरं पाहता, त्यासमयी आपले अन्य प्रियजनांकरिता असलेले कर्तव्य महत्वपूर्ण होते आणि माझे पांडवा- यादवांप्रति असलेले कर्तव्य त्याक्षणी महत्त्वपूर्ण होते, म्हणून आपण कर्तव्यामध्ये निमग्न होतो. मात्र या काळात इतका समय आहे की मी तुझ्यासह आणि आपल्या प्रिय मित्रासह अर्जुनासह समय

व्यतित करू शकतो, याशिवाय तू आणि पांडुपुत्र एकत्रितपणे राजकार्य करू शकतात.”

“मात्र मला अश्वमेधाची चिंता आहे.” कृष्णेने म्हटले, “इंद्रप्रस्थाची संपत्ती घेण्याचा विचार आहे किंतु ती संपत्ती प्रजाजनांच्या, विधवा व बालकांच्या जीविकेची व्यवस्था करण्यासाठी पर्याप्त आहे. (जरी ती असीम आणि अमाप असली तरी...... ) तर आम्हा सर्वांच्या महत्त्वकांक्षेनुरुप अश्वमेध यज्ञ आणि पुन्हा दिक्भ्रमण करण्यासाठी संपत्ती कुठून येईल, केशवा? मला तर याची चिंता वाटते आहे.”

“चिंता करु नकोस, कारण चिंता मनाला जाळते.” कृष्णाने तिच्या स्कंधावर हात ठेवला, “जे जे घडेल ते ते तुम्हां पांडुपुत्राच्या आणि पांचालीच्या कल्याणाकरिताच होईल गं. सखे, आजपर्यंत पांडवांच्या प्रत्येक समस्येचे निवारण सदैव होत आलेले आहे, कधी नियतीद्वारे, कधी तुझ्याद्वारे अथवा कधी कधी स्वयं पांडवाद्वारे. त्यांना आणि

तुला जीवनात अनेक संकटे झेलावी लागली. परंतु त्या संकटाचे निवारण झाले ना, त्याप्रमाणेच आताच्याही विपदेचे-चिंतेचे निवारण निश्चितच होईल." कृष्णाचे आश्वासन.

"तू योग्य म्हणतोस! ज्याक्षणी पांडवांच्या जीवनात समस्या निर्माण झाल्या, पांडवांवर आणि माझ्यावर ज्या ज्या समयी विपदा कोसळल्या, त्याक्षणी व्यासदेवांनी, देवर्षिंनी, अन्य महर्षिंनी तसेच शश्वुर विदुरांनी आम्हाला साहाय्य केले आहे." पांचालीने विश्वासाने म्हटले.

"आम्हीदेखील त्या विपदेचे निवारण केले होते."

"आणि मी?" कृष्णाने अधीरतेने विचारले. "अर्थातच! तू देखील आम्हांला साहाय्य करतच होतास आणि करतच आहेस." द्रौपदीने हसून म्हटले.

"मला वाटलं, देवर्षी नारद आपल्याला उचित मार्गदर्शन करु शकतील!" कृष्णाने म्हटले. तत्क्षणी नकुल

त्या दोघांनिकट आला आणि त्याने त्या दोघांच्या स्कंधावर हात ठेवले, "कृष्णा आणि नीलांगिनी!"

"आर्य, आपण?" द्रौपदीने मागे वळून पाहिले आणि पाहतच राहिली. इतस्ततः विखुरलेले केश, स्वप्निल नेत्र आणि विस्कटलेली वस्त्रे, या निद्रातुर व अनलंकृत अवस्थेतही आणि इतक्या काळानंतरही नकुलाचे सौंदर्य-कांती अजूनही तसेच होते.

"अशी का पाहतेस?" नकुलाच्या प्रश्नावर द्रौपदी लज्जित झाली.

"आपण अजूनही सुंदर दिसता!" द्रोपदीने म्हटले.

"काहीतरीच तुझं द्रौपदी! तूही अगदी तशीच लज्जित होतेस, अजूनही!" नकुलही आपल्या स्तुतीकारणे पूर्वीप्रमाणेच संकोचला.

"परंतु मीच सर्वांगसुंदर आहे." कृष्णाने म्हटले.

"नाही, दुग्धाप्रमाणे-कुमुदिनीप्रमाणे असलेला श्वेतवर्ण श्रेष्ठ असतो. लावण्यामध्ये गौरवर्णाचे स्थान अचल आहे." नकुलाचे पूर्वीचेच वाक्य! यावर कृष्ण खळखळून हसला. तर द्रौपदीने कृतक कोपाने नकूलाकडे पहात म्हटले, "आणि श्याम वर्णाविषयी काय म्हणाल,(नकुल) आर्य?"

"तुझ्यासमोर तर श्याम वर्णाविषयी काही बोलण्याचे माझे तरी साहस नाही. कारण तुझे श्यामवर्णीय सौंदर्य आणि अग्नीप्रमाणे झळाळते तेज-कांती, आणि माझ्यासमोर प्रतिभावान विद्वानालाही शब्द सुचत नाहीत, मात्र तुझ्या या लावण्याने सर्व गौरवर्णी सुंदरींना परास्त केले आहे, हे सत्य, अन् अजूनही तुझे सौंदर्य तेजच लोपलेले नाही." नकूलाच्या शब्दावर द्रौपदीने म्हटले, "परंतु हे सौंदर्य......."

"नकुला! कित्येक दिनांनी तू गौर- श्यामवर्णावर विवाद केला आहेस." कृष्णाच्या शब्दाने नकुलाचे दुःख आप सूकच बाहेर पडले. द्रौपदी काही क्षणांपूर्वी म्हणाली होती

की मी अजूनही सुंदर आहे. मात्र याच सुंदर मुखावर दुःख, वैषम्य, औदासिन्य आदि भावनांचे मेघ आले आहेत. म्हणून मी प्रयत्न केला, या परिस्थितीतही हसण्याचा!”

“आर्यपुत्र, मी आपले दुःख जाणते. जे तुमचे दुःख आहे, तेच माझे दुःख आहे. मात्र प्रजापासून अश्वमेध यज्ञ, द्विक्भ्रमण, अश्वाची प्राप्ती आणि विशेषतः उत्तरेचे तसेच अन्य पांडवस्त्रियांचे सांत्वन, परीक्षिताचे संगोपन करणे आवश्यक आहे, त्याकरिता स्वतःला सावरणे हेही (आताच्या काळाची) सद्यकाळाची आवश्यकता आहे. म्हणून आपण सर्वत्र स्वतःला सावरणेच उचित ठरेल.” द्रौपदीने मार्मिक शब्दाने त्याचे सांत्वन केले.

नकुलाने म्हटले, “मला ज्ञात आहे, तू सांत्वना स्वतःला देत आहेस, मला सांत्वना देण्याच्या निमित्ताने. तू दुःखी आहेस, अन्य पांडव स्त्रियांपेक्षा. मी करेणुमती, सुव्रता या उभय स्त्रियांचे सांत्वन करुन आलो आहे. मात्र तुझे सांत्वन

करण्याचे धैर्य माझ्यात नव्हे, मी कितीही धैर्यवान असलो तरी! पांचाली, तुझ्या पुत्रशोकांकारणे मीही दुःखी आहे.” यावर कृष्णाने गंभीरपणे म्हटले, “मला एक ज्ञात आहे, असे द्विधेचे क्षण, मनोवैष्यमाचे क्षण या छत्तीस वर्षात येणार आहेत, तेही वारंवार. त्याक्षणी स्वतःला सावरून आयुष्य पथावर अग्रेसर राहणे, हेच अत्यावश्यक असते. कारण काळ कुणासाठीही थांबत नसतो, म्हणून आपणही थांबता कामा नये. आपणही समयाची गती ग्रहण केली पाहिजे. म्हणूनच विद्वानगण व नदी एकाच ठिकाणी थांबल्यास नदीचा पंक होतो तर विद्वान, साधु मोहग्रस्त.”

"आर्यपुत्र, इतक्या धनाचा व्यय झाला, प्रजानना, विधवा, अनाथ बालकांच्या पुनर्वसनाकरिता. म्हणजे श्यामवर्ण अश्वाचा क्रयासाठी पर्याप्त मुद्रिकाही नव्हेत. तर दिग्विजय आणि दिक्भ्रमणासाठी मुद्रिका आणि रथ, कसे प्राप्त होतील? रथ तर युद्धामध्ये नष्ट झाले आहेत. अश्वमेधात दानधर्म, यज्ञयाग, पुरोहितांनी दक्षिणा, गोधन, वेदी-भवने-गोपुर उभारण्याकरिता पर्याप्त धन, मुद्रिका, रत्ने-माणके आणि कृष्णाजिने कुठून प्राप्त होणार?" द्रौपदी नकुल-सहदेवाद्वारे प्रबंध केलेल्या धन- व्ययाची गणना पत्र वाचत होती.

“आपण काहीतरी व्यवस्था करु?” नकुलाने म्हटले. “चिंता करु नकोस. सर्व काही कुशल आणि उत्तम!” सहदेवाने दूरदर्शितेने भविष्य पाहत पांचालीच्या स्कंधास थोपाटून तिला आश्वस्त केले.

“आर्य, मी महामंत्री विदुरांसह चर्चा करुन श्यामवर्ण अश्वाचा क्रय, दिक्भ्रमण, पुरोहितांची दक्षिणा, अन्नछत्रे, वेदी-गोपुर-भवने निर्माण करण्यासाठी, इत्यादी कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुद्रिका, रथ, अजिने, रत्ने तसेच धान्याची वेधबाध्य गणना करते. त्याकारणे भावी प्राप्ती आणि व्यया‌चे संज्ञान प्राप्त होईल.” असे म्हणून द्रौपदी विदुराच्या कक्षात प्रयाण केले.

विदुर आपल्या कक्षात आपल्या पत्नी-पार्श्वतीसह पुष्प सज्जा करत होते. तत्क्षणी पांचाली आली, “काकाश्री विदुर! आपण निष्कारण का कष्ट घेतात? दासी वा सेवकाला बोलावले असते. आपण व्यर्थ कष्ट घेताहात. आपण

विश्रांती घेऊन आम्हाला मार्गदर्शन करावे, इतकीच आमची इच्छा आहे.” पांचालीने त्या उभयंताचे चरण शिवले. विदुर व पार्श्वतीने तिला आर्शिवाद दिला, “शतायुषी भव! अखंड सौभाग्यवती भव!” तुझें सदैव कल्याण-मंगल होवो!”

“आपला आशिष आम्हांला सदैव प्राप्त असेलच व आहेच. मला आपल्याकडून मार्गदर्शन हवे आहे, काकाश्री!” द्रौपदीने विदुर व पार्श्वतीसह आसन ग्रहण केले.

“हे पांचाली! तू स्वतः विदुषी आहेस. तुला धर्माचे-सदाचाराचे, राजनीती, अर्थ नियोजन व सदाचाराचे उत्तम ज्ञान आहे. याशिवाय तू स्वतः सम्राज्ञी आहेस आणि विचारीही. तुला मार्गदर्शन करण्याची काय आवश्यकता? विदुराने सहजपणे म्हटले.

“श्वसुर विदुर! आपण जाणत असालच की प्रजाजनांचे, विधवा तसेच अनाथांचे- बालकांचे पुनर्वसन झाले आहे. मात्र दिक्भ्रमण, श्यामकर्ण अश्व व अश्वमेध यागाकरिता

पर्याप्त धन उपलब्ध नाही." पांचालीच्या शब्दांवर विदुराने हसत म्हटले, "द्रुपदकन्ये! यथावकाश तुझ्या या समस्येचे ही निवारण होईल."

तत्क्षणी एक दासी कक्षाच्या द्वारात प्रवेशली, "महाराणी द्रौपदी देवींचा विजय असो!" देवर्षी नारद आपणांस व आपल्या पतींना मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या कक्षात प्रवेशले आहेत!"

या शब्दांवर विदुराने गूढ स्मित केले व पांचालीला तिच्या कक्षात गमन करण्याची अनुमती दिली.

तिने आपल्या कक्षात प्रवेश केला. तिच्या कक्षात नारदमुनी तिच्या पतींना मार्गदर्शन करत होते, "युधिष्ठिर! तू या विनाशातून स्वतःला सावर. यासमयी तू शोक करु नकोस. तुला दिक्भ्रमण, श्यामकर्ण अश्व तसेच यज्ञाकरिता मुद्रिका, धन-धान्य प्राप्त निश्चितच प्राप्त होईल."

"ते कसे, देवर्षी?" युधिष्ठिराचा प्रश्न.

“हिमालमामध्ये-कुबेराच्या अमरावतीमध्ये मरुत, रश्मी व ऋभूने या देवतांची यज्ञे करुन पृथ्वी वरील राजांना विविध रत्ने, मुद्रिका, धन-धान्य दान म्हणून दिले होते, मात्र इतकी रत्ने-संपत्ती, धान्य अनेक नरेश नेऊ शकले नाहीत. म्हणून त्यांनी ते धन-धान्य आदि संपत्ती मानससरोवराच्या जवळ गुहेमध्ये सुरक्षित ठेवले आहे. आता तेच धन -धान्य, मुद्रिका तुला उपलब्ध होणार आहे. तू, भीमार्जुन व दोन्ही जुळया बंधुंना अनेक शकटिकांसह तेथे पाठव, जेणेकरून ते इतकी संपत्ती, धनधान्य इंद्रप्रस्थात व हस्तिनापुरात घेऊन येतील.” नारदांनी म्हटले.

“आणि आमच्यासहही अनेक सहाय्यकही असतील. ते हार्दिक, कृतवर्मा, सात्यकी, चारुदेष्ण व चारुमतीही असतील, ज्येष्ठा!” भीमसेनाने काहीच विचार न करता नारदांच्या शब्दांना होकार दिला तसेच सहमतीही दर्शवली.

“मात्र हे अनुचित आहे. ते धन जर त्या राजांचे होते, तर आम्ही ते ग्रहण केल्यास हे कर्म चौर्यकर्म सिध्द होईल. तर या धनावर आम्हां सर्वांचा अधिकार कसा होऊ शकतो?” नकुलाचा विवेकी प्रश्न.

“पुत्रा! हे धन ज्या राजांचे होते, ते राजे कधीच मृत्युमुखी पडले आहेत. त्यांचे वंशजही युध्दात धारातीर्थी पडले आहेत. त्याकारणे ते धन कोणाच्याही अधिकारात नव्हे. अशा पवित्र धन-धान्य आणि संपत्तीचा नाश होण्यापेक्षा भोग, दान आणि व्यय ह्या उत्तम गतींस ही संपत्ती प्राप्त झाली पाहिजे.” देवर्षींचे उत्तर.

“आणि याशिवाय ही संपत्ती अधिकृत असून तिचा उपयोग दानधर्म, लोककार्य, जनहित, व्यय, जनतेच्या पुनर्वसनासाठी, यज्ञयाग अथवा उपभोगासाठी होत नसेल तर नियमांप्रमाणे-विधानांप्रमाणे ह्या संपत्तीचा समावेश चक्रवती सम्राट्‌टाच्या अथवा विजयी नरेशाच्या राजकोषात

झाला पाहिजे. अन्यथा ती धनधान्य, रत्ने- माणिके, वस्त्रांनी परिपूर्ण असलेल्या दिव्य, पवित्र संपत्तीचा नाश होईल. म्हणून दान, व्यय व भोग याच उत्तम गती आहेत.” सहदेव नारदांशी सहमत झाला होता. “नकुला, देवर्षिंचे शब्द न्यायोचित आहेत.”

“उचित म्हणालात, आपण, आर्यपुत्र सहदेव! अन्यथा स्वार्थी, लोभी जन व असुर या धनाचा प्रयोग अनुचित कार्यासाठी करतील. म्हणून हे धन ग्रहण करणे आवश्यक आहे.” असे म्हणून पांचालीने देवर्षिंना प्रणाम केला, “देवर्षि, आपले मार्गदर्शन लाभले म्हणून माझ्या समस्येचे निवारण झाले.”

“पाहिलेस, कृष्णे! प्रत्येक वेळी विपद्काळात कुणी ना कुणी आपल्या साहाय्याकरिता धावूनच येते!” अर्जुन सश्रद्ध स्वरात म्हणाला.

"आता त्या अंध नरेशाला ही वार्ता दिली पाहिजे, पांचाली!" भीमाचे क्रुद्ध शब्द भीषण भविष्याचे द्वार खटखटवत होते.

धृतराष्ट्र व गांधारी भोजन करुन आसनस्थ झाले होते. तसा सहदेव तिच्या शेजारी जाऊन बसला व त्याने सहेतुकपणे म्हटले, “राजमाते, तू तुझ्या भातृहन्त्याला भोजन भरवणार नाही का?” हे ऐकल्यानंतर गांधारीने सहदेवाचे मुख चाचपडत त्याला भोजन भरवत म्हटले, “वस्त्रहरणानंतर तर त्या असभ्य व अशिष्ट व्यक्तीला मी ‘भ्राता’ कधीच म्हटले नाही आणि युद्धानंतर मी त्याच्या शवाकडे पाहिलेही नाही. कारण त्याच्या अनुचित कर्माकारणे माझ्या पुत्रांचा नाश झाला.”

“आणि तुझ्या पुत्रांची कुठलीही अनुचित कृती नव्हती का, तुझ्या पुत्रांच्या नाशाकरिता? भीमाने धृतराष्ट्राच्या भोजनात मृत्तिका मिसळली, “ज्याप्रमाणे तुझ्या पुत्रांनी माझ्या भोजनात विष मिसळले, त्याचप्रमाणे मी तुझ्या भोजनात मृत्तिका मिसळली आहे. हे परास्त नरेश! तुझ्या पुत्रांनी तर आमच्या आणि आमच्या प्राणप्रिया-पांचालीच्या जीवनात विष मिसळले आहे.”

“आम्हांला ज्ञात नाही, आमचे हे आचरण अनुचित आहे की न्यायोचित. आणि मी विद्वान असलो, तरी हे सर्व जाणून घेण्यात मला रस नाही व इच्छाही नाही. कारण हे नरेशा! तू अविचारीपणाने आचरण केलेस, तू पुत्रमोहाकारणे अंध झाला होतास. म्हणूनच त्या कर्मांची फलिते म्हणजे तुझ्या वंशलतेचा नाश आणि तुझाही, परास्त युवराजांची माता! पूर्वी राजमाता असणारी, आता तू राजमाता नव्हेस.” नकुलाचे शब्दही निंदनीय होते.

“आता आमची माता-राजमाता कुंतीदेवी तुझ्यापेक्षा सर्वश्रेष्ठ स्थानावर आहे. त्याकारणे हा मत्सराचा अग्नि असाच वसू दे, तुझ्या मनात!” भीमाने असे म्हटले.

“अंध असूनही तू आम्हांला पीडा दिल्या आहेस, त्या पीडा आम्ही परत देण्याचा प्रयत्न करतो आहोत.” सहदेवाने हसत म्हटले, हे नरेशा!”

“खरंच? तू शुध्दीवर आहेस ना, प्रिय सहदेव? तू मला सदैव प्रिय होतास, आपल्या बुध्दीमत्तेच्या आणि विवेकाकारणे. मात्र तू या क्षमतांचा उपयोग आता केलेला वाटत नाही. कारण तुम्हां पांडवांच्या वंशाचाही संहार झालेला आहे.” गांधारीनेही हसत म्हटले.

“तू अनुचित म्हणते आहेस, कारण पांडवा्चा प्रत्येक पौत्र- परीक्षितासह मेघधनु आणि अर्जुन पुत्र बभ्रुवाहन जिवित आहे. आणि याशिवाय......” भीमाच्या या शब्दांचे समर्थन करत सहदेवाने म्हटले, “याशिवाय

आमच्या पुत्रांच्या मृत्युला ‘वीरगती’ व ‘बलिदान’ अशा शब्दांनी विभूषित केले जाईल व तुझ्या पुत्रांच्या मृत्यूला ‘दुष्टांचा वध’ ‘नराधमांचा संहार असे म्हटले जाईल.”

“आर्यपुत्र!” हे सर्व काही पांचालीने पाहिले होते. तिच्या सह युधिष्ठिरही होता.

“पांचाली, तू!” भीम अंचबित झाला. “तू तर अश्वांचे व त्यांचे निरीक्षण व परीक्षण करण्याकरिता अश्वशालेत गमन करणार होतीस, याशिवाय रथागारातही तुझे कार्य होते ना!”

“मला त्यांचे संपूर्णपणे ज्ञान आहे व शकटिकांचेही. मात्र त्यांना जोडण्याकरिता आवश्यक असलेले जातिवंत अश्व आणि ऋषभ हवेत. त्यासाठी नकुल-सहदेवांचे सहाय्य हवे होते.” पांचालीने म्हटले.

“मी अवश्य येत आहे, नीलांगिनी!” असे म्हणून नकुलाने सहदेवाच्या बाहूला धरले, “चल सहदेवा!”

“मात्र ज्येष्ठा! तू तर चारुमती, चारुदेष्ण, सात्यकी, हार्दिक्य आणि कृतवर्म्याला आदेश देणार होतास ना?” सहदेवाने प्रश्न केला.

“आर्यपुत्र! आपणही माझ्यासह खणण्याकरिता आवश्यक साहित्य एकत्रित करण्याकरिता यावे.” द्रौपदीने भीमाला म्हटले.

तसे भीम, नकुल-सहदेव कक्षाबाहेर पडले. त्याक्षणी युधिष्ठिर व द्रौपदीने धृतराष्ट्र-गांधारीचे चरण शिवले.

मात्र त्या उभयतांनी आशिर्वाद दिला नाही. ते पाहून निरलसतेने युधिष्ठिर-द्रौपदी कक्षाबाहेर पडले.

“पांचाली! भीम व जुळया बंधुंनी जे केले, ते अनुचित होते!”

“मला आपले शब्द पटताहेत, म्हणूनच मी त्यांना एकांतात समजावण्याकरिता विभिन्न स्थानी बोलावले आहे.” पांचालीने म्हटले.

"तू त्यांना का एकांतात समजविणार आहेस? द्युतसभेत तर तू धर्मज्ञानींना आणि आम्हांला सर्वांदेखतच धर्माचे आणि सत्याचे संज्ञान देत होती!" युधिष्ठिराचा उपरोधिक स्वर.

यावर पांचालीने उत्तर दिले, "कारण त्याक्षणी धर्माच्या किर्तीवर आणि माझ्या सन्मानावर सावट आले होते. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. जर मी पांडुपुत्रांना त्यांच्या शत्रूदेखत त्यांची चूक लक्षात आणून दिली असती, तर त्यांना त्यांचा अपमान वाटला असता व शत्रूंना प्रसन्नता लाभली असती."

"नरेश धृतराष्ट्र आणि राजमाता गांधारी आपले शत्रू नव्हेत!" युधिष्ठिराचा विरोधी स्वर, मात्र हा विरोध हृदयातून आलेला नव्हता. हा विरोध वरवरचा होता. त्यालाही त्या वृद्ध दंपतिचा क्रोध आला होता.

“आर्यपुत्र, मी हे म्हटले नाही की आपण त्या दांपत्याचे शत्रू आहोत. कारण तेच पूर्वाश्रमीपासून- पांडवांच्या बालपणापासून त्यांच्या अधिकार, कीर्ती, यश, आनंद आणि जीवनाचे शत्रू झाले आहेत. दयुत, वस्त्रहरण, वारणावत, लाक्षागृह, विषप्रदान अशा कारस्थानांना महाराज धृतराष्ट्रांचा सहभाग व संमती होती. आणि ह्या राजमाता गांधारी पुत्रशोकाने पीडीत होऊन गांधारनरेशांना दोष देत होत्या, त्या राजमाता गांधारीने पूर्वीच आपल्या भ्रात्याला गांधारदेशाला पाठवून द्यायला हवे होते ना! मात्र त्यांनी तसे केले नाही. त्याच्या मनातही महत्वाकांक्षा होती की सत्ता दुर्योधनाच्या हातात असावी!” द्रौपदीचे शब्द अखंडनीय होते, तिच्या तर्कांना खोडून काढणे शक्य नव्हते.

त्याकारणे युधिष्ठिर निरुत्तर राहिला. काही वेळाने त्याने म्हटले, “जे काही घडले अथवा मी स्वनेत्री जे काही पाहिले, त्याकारणे माझ्या मस्तकात वादळ घोंघावताहेत. मी स्वस्थचित्त नाही. म्हणूनच विश्रांती घेण्याकरिता मी

शयनकक्षात गमन करत आहे. तू माझी कार्ये पूर्ण कर, माझी सहधर्मिनी होऊन, कल्याणी! माझ्याकरिता विश्रामाची व्यवस्था कर.”

“आर्यपुत्र! अशा तऱ्हेने कर्तव्यकर्मे टाळणे उचित नाही.” असे म्हणून द्रौपदीने युधिष्ठिराला रोखले. मात्र युधिष्ठिराने म्हटले, “तू तुझ्या दासी-सेवकांना माझ्या पदसेवेकरिता आणि मला वारा घालण्याकरिता माझ्या कक्षात पाठव. मला विश्रांतीची आवश्यकता आहे.”

असे म्हणून त्याने प्रस्थान केले. पांचालीने त्याच्या सेवेकरिता सेविकांना पाठवले.

त्याक्षणीच इंद्रसेनाने संदेश आणला की अश्वशालेत नकुल-सहदेव प्रतिक्षा करताहेत.

"आर्यपुत्र! मी त्या वृद्ध दंपतिसमोर काही नाही बोलले, कारण तो तुम्हाला तुमचा अपमान वाटला असता. म्हणून मी आपणांस हेच सांगू इच्छिते आहे की आपण कृपया पुनः विवेकहीन आचरण करु नका. कारण ते अनुचित आहे. मला ज्ञात आहे की महाराज-महाराणींनी जी उपेक्षा तुमची केली आहे, तुमच्याविषयी द्वैष बाळगला होता, तुमच्या विरुद्धच्या कारस्थानात ते सहभागी होते, मात्र त्यांच्या कर्मांची फलिते त्यांना प्राप्त झालेली आहेत. त्याकारणे त्यांना असे बोलून आपल्या विवेक तसेच मन:शांतीचा विघात करु नका! पांचालीने नकुल-सहदेवांना म्हटले.

यावर नकुलाने तिचा हात हाती धरुन म्हटले, "मी निश्चितच प्रयत्न करेन."

“नकुला, अशी कृती टाळणे आवश्यक आहे.” सहदेवाने म्हटले, “विवेकाचा विघात करण्यात प्राज्ञता नव्हे.”

“आपण असे आचरण टाळण्यावर भर देऊ.” नकुलही सहमत झाला.

नकुल-सहादेवांना समजावून सांगितले. मात्र भीमाला कसे समजावून सांगावे, याचा ती विचार करू लागली. तिने जर तसेच सांगितले तर भीम दुखावला जाईल व तो क्रुद्ध होईल.

परंतु विचार करता करता तिला एक युक्ती सुचली. तिने सामग्र्यागारामध्ये प्रयाण केले, तेथे भीमसेन खणनाची सामुग्री एकत्रित करत होता. तत्क्षणी पांचलीने त्याला मुद्रा परिक्षक सयंत्रक देत म्हटले, “आर्य आपणांस तर या सयंत्राचे विस्मरण घडले होते ना! हे घ्यावे.”

“पांचाली मला एक तर प्रतिशोधाचा आनंद प्राप्त होत होता आणि तू कार्याच्या निमित्ताने मला येथे आणलेस.

भीमाने रोषाने म्हटले. मला वाटते, तुला युधिष्ठिराप्रमाणेच त्या स्थविरांची दया येत असणार, म्हणून तूही मला समजावून सांगणार असशील. मात्र पांचाली कुरूपुत्रांनी तुझा केलेला अपमान, वस्त्रहरण, केशाकर्षण, वनवास, युद्ध तसेच युध्दाने झालेली हानी हे सर्व का घडलं? कारण या उभयंता स्थविरांचे मौन. राजमाता गांधारी शेवटी शेवटी स्वतःच्या पुत्राला उपदेश करू लागली. तत्पूर्वी तिला त्याचे आचरण अनुचित वाटले नाही. आम्हाला मृत्यू देण्याचे व आम्हाला स्वहक्क, संपत्ती, सत्तेपासून वंचित करण्याचे प्रयत्न करण्यात आले. तरीही हे उभयंता मौन होते आणि तू उदासीनतेनेच मला असे सांगणार आहेस की तुम्ही त्यांच्याशी असे आचरण करू नका, तेही त्या युधिष्ठिराच्या म्हणण्यानुरुप!"

भीमाचा उद्वेग आणि सत्य वेध पाहून पांचाली अचंबित झाली नाही. तिने शांतपणे म्हटले, "आर्यपुत्र, आपण बुद्धिमान आहात, आपण घेतलेला वेध अर्धसत्य आहे. मी

हेच सांगणार आहे, उदासीनतेने नव्हे. कारण पांडवांची पट्टराणी पांडवांप्रति उदासीन असू शकते का?”

“क्षमा कर, मी रोषापायी हे बोललो. परंतु तू स्वतःप्रति स्वतःच्या दु:खाप्रति आणि स्वतःच्या भावनाप्रति उदासीन झाली आहेस का? की पतीच्या आज्ञेखातर तू स्वतःच्या भावना दाबून टाकल्या आहेत? की या नाशानंतर अथवा पुत्रशोकांकारणे तू विरक्त झाली आहेस? कारण तुला हे स्मरत नाही की तुझा अपमान ते अंधपुत्र करत असताना तो अंध नरेश कर्णबधिर झाला होता?” भीमाच्या या शब्दांवर पांचाली उद्वेलित झाली, “आर्यपुत्र, मला हेही स्मरते, आपण सर्व पांडव कसे निर्विरोध होतात, वस्त्रहरणावेळी!”

हे ऐकून भीम लज्जित झाला. त्याचे अनुतापपूर्ण मुख पाहून पांचालीने विनंतीच्या स्वरुपात म्हटले, “आर्य, आपण माझी प्रत्येक इच्छा पूर्ण केलीत, ती दु:शासन वधाची, कौरवसंहाराची असो वा सुंदर कमल आणण्याची

असो, माझ्याकरिता सरोवर करण्याची अथवा कीचकवधाची असो, आता आपण माझी हीच इच्छा पूर्ण करा, आपण आपल्या क्रोधाचे नियमन करावे.”

“पांचाली, तुझे यदि असे म्हणणे आहे की मी तुझी प्रत्येक इच्छा पूर्ण केली आहे, तर तूही माझी हीच इच्छा पूर्ण करावीस. मी त्या स्थविरांवर क्रुद्ध होत असताना तू रोखू नको मला.” भीमाने अधिकाराने म्हटले.

“आर्यपुत्र, मी आपल्या इच्छेचा अव्हेर करु शकत नाही. परंतु एकच सांगू इच्छिते की ह्या क्रोधाकारणे आपली आता निंदा होऊ शकते. याशिवाय परिवारात पुनः संघर्ष उत्पन्न होऊ शकतो. आणि राजमाता अन् महाराजांना दैवाने महाभयंकर शिक्षा दिली आहे, म्हणून आपण नियतीची भूमिका ग्रहण करु नये.” पांचालीने शांतपणे भीमाला सांगितले. यावर भीमाने प्रश्न केला, “कसली शिक्षा? पांचाली?

“आर्यपुत्र, ज्या उभयतांनी पांडवांना शत्रू मानून ज्यांचा जीवनभर द्वेष केला, त्यांना अधिकारापासून वंचित ठेवले, ते स्वयं पुत्र, पौत्र, सत्ता, अधिकार आणि राज्यापासून वंचित असून त्यांना हस्तिनापूरात पांडवांच्याच आधीन राहावे लागत आहे, ही शिक्षाच तर आहे ना?” तिने म्हटले.

“पांचाली, तुझे शब्द मला पटताहेत. माझी विवेकबुद्धी तुझ्या शब्दांशी सहमत आहे, माझे धर्माचरणही तुझ्या शब्दांशी अनुमोदन दर्शवत आहे आणि ते सदैव दर्शवित राहिल. कारण तू स्वयं धर्माचारिणी- धर्मस्वरुपा आहेस. तुझे शब्द विदुषीप्रमाणे सुशोभनीय आहेत. तुझे तार्किक शब्द कुणाही विद्वानाला आणि धर्मज्ञाला पटतील, मात्र माझा क्रोध इतक्यात संयत होणे शक्य नाही. कारण इतक्या वर्षांपासून हा क्रोध माझ्या मनात साठवून होता. हे विष माझ्या मनात क्षणाक्षणाने पेरले जात होते.” भीमाने दुःखाने म्हटलेहे व खेदानेही.

पांचाली त्याच्या स्वभाव जाणून होती. मनुष्याचा स्वभाव धर्म सहजासहजी परिवर्तित होत नाही, याउलट वर्षानुवर्षे तो स्वभाव पक्का घटाप्रमाणे दृढ होत जातो, हेही तिला ज्ञात होते म्हणून तिने विचार केला, भीमाचा कौरवांविषयी क्रोध व विद्वेष दृढ होण्याकरिता बालपणी लाडवातून विष दिले जाणे, लाक्षागृहदहन, द्युत, वस्त्रहरण तसेच युध्दातील अधर्म इत्यादी घटना कारणीभूत ठरल्या आहेत, म्हणूनच भीमसेनाच्या मनातील क्रोध -विद्वेष शमावा याकरिता समय देणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांच्या हदयातील क्षोभहिम वितळणार नाही, असे तिने ठरवले.

## सप्तम बंध

**चा**रही पांडवांनी मानसरोवराच्या जवळच्या गुहेतून तसेच अन्य स्थलांवरुन धन, धान्य, रत्ने, मुद्रिका तसेच सुवर्ण आणले,खणन करुन. शकटिका आणि अश्व त्या संपत्तीच्या भारानेच झुकून चालत होते. शकटिकाही रत्नांनी भरिभार भरलेल्या होत्या. त्या संपत्तीच्या तेजाकारणे सर्वांचे नेत्र दिपून गेले. त्या धनाविषयी कृतवर्म्याच्या मनात लालसा निर्माण झाली. हे चारुमतीच्या लक्षात आले आणि तिने त्याला द्वारकेला प्रस्थान करण्याची आज्ञा दिली.

चारी पांडवांच्या यशस्वी परतीनंतर पांचालीने स्वागत केले आणि युधिष्ठिराने अश्वमेधाचे आयोजन केले. त्यानुरूप

अर्जुनाने श्यामकर्ण अश्वासह अन्य मांडलिक राजांकडे गमन केले. ते पाहून पांचालीचे मन भावुक झाले. तिच्या मनात आले, अर्जुनाच्या जीवनात प्रियजनांचा विरह का लिहिला आहे? त्यांना आपल्यापासून सतत दूर का जावे लागले. एकांतभंगाचे प्रायश्चित, नंतर दिग्विजयाकरिता, नंतर वनवासी जीवनात पाच वर्षे तपश्चर्येकरिता आणि आताही श्याम कर्ण अश्वाचे पूजनाकरिता त्यांना आपल्या सर्वांपासून दूर जावे लागते आहे.

तिने तसा प्रश्न कृष्णालाही विचारला की, “कृष्णा! सख्या! फक्त आर्यपुत्र अर्जुनांनाच का आयुष्यभर असे भ्रमण करावे लागते? ज्याक्षणी एकांतभ़ग झाला, त्याक्षणी अर्जुनांनाच वनगमन करावे लागले होते, त्यानंतर कर्तव्याकरिता अर्जुनांनी (आर्यपुत्र) केले, मात्र नंतर पांडवांना सिद्धी, साध्य, शस्त्रे, अस्त्रे आणि पुण्य प्राप्त करुन देण्याकरिता आर्य पुत्र पार्थांनाच तपश्चर्येकरिता प्रयाण करावे लागले. आताही श्यामकर्ण अश्वाच्या संरक्षणासाठी

अर्जुनांनाच प्रस्थान करावे लागते आहे, असं का? माझ्या प्रश्नाचे उत्तर दे.” तिच्या प्रश्नावर कृष्ण हसला.”

याचाच अर्थ भीम, नकुल- सहदेव तुझ्यापासून दूर झाला असता तर....... अर्थातच अन्य कार्याकरिता!”

“हा प्रश्नच व्यर्थ आहे, कृष्णा! कारण पंचपांडव माझे पंचप्राण आहेत.” तिने म्हटले.

“मात्र माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रति प्रश्नाने का दिलेस? याचाच अर्थ विपदा आणि अभ्युदय, मिलन आणि विरह, सुख आणि दुःख, हया सर्व दैवगती आहेत हे सर्व विध्यात्याने निश्चित केले आहे. मात्र परमेश्वराने आर्य अर्जुनांचे भाग्य असेच का लिहिले? पांचालीने त्रासिकपणे म्हटले.

“पांचाली, तू माझी परमसखी आहेस. कारण तू माझ्या मनातील प्रत्येक भाव मी बोलण्याआधीच तू जाणून घेतेस, आम्ही उभयंता एकरुप व अभिन्न आहोत. परंतु तुझ्या

प्रश्नाचे असे उत्तर आहे की.......” कृष्णाचे वाक्य तोडत द्रौपदीने क्रोधाने म्हटले, “तू हेच म्हणशील की ज्यांची सहनशक्ती, धैर्य, संयम, तपोवृत्ती आणि सत्प्रवृत्ती अधिक उत्कृष्ट असते, त्यांच्याकरिताच ईश्वर विपदांचे प्रयोजन करतो, अन्य दुर्बलांकरिता नव्हे. हिरकालाही सप्तरंगी-कीर्तीभूत होण्यासाठी सूर्याची दाहकिरणे सहन करावी लागतात.”

असे म्हणून पांचालीने क्रोधाने अन्य राजकार्याकरिता प्रदोषस्थानात व कोषागारात प्रस्थान केले.

“पांचाली, कृष्णे? तू अगदी माझ्या मनातलेच बोललीस. परंतु सत्य कटु असते आणि ते पचविण्याचे सामर्थ्य तुझ्यात निश्चितच आहे.” कृष्णाने म्हटले.

**“अग्निनामीळे पुरोहितम् यज्ञस्य देवमृत्विजम्|**

**होतारम् रत्नधातमम् ||**

**अग्नि पूर्वभिऋषिभरीडयो नूतनैरुत |**

**स देवां एह वक्षाति!”**

पुरोहित वेदमंत्राचे, अग्निसूक्ताचे पठण करत होते. युधिष्ठिर आणि द्रौपदी आहुती देत अग्नीचे आवाहन करत होते. त्यांच्यासह अन्य पांडवही उपस्थित होते, तेही अग्नीला हविष्य प्रदान करत होते. त्यानंतर त्या सर्वांनी श्यामकर्णा अश्वाची पूजा करुन त्याला पुष्पे अर्पण केली. त्यानंतर पुनश्च याग झाला. यागानंतर पांडवांनी पांचालीसह

पुरोहितांना राजदक्षिणा दिली, त्यानंतर ब्राह्मण -क्षत्रियांना धन-धान्य प्रदान केले व त्या त्यानंतर पांडव -द्रौपदीने श्यामकर्ण अश्वाची शोभायात्रा नगरीतच (संपूर्ण) काढली, त्याकारणे सर्व नागरिक-प्रजानन त्या अश्वाचे दर्शन घेऊ लागले.

आणि सर्वात शेवटी, पांडवांनी क्षेत्र पुरुषाला आहुती देऊन पांचालीसह आश्वमेधिक सार्वभौम राज्याचे अन् राज्यपदाचे स्वीकारले आणि सपत्नीक शस्त्रेही धारण केली. अशा तऱ्हेने अश्वमेध पूर्ण झाल्यानंतर सर्व पांडवांनी पांचालीसह प्रदोष स्थानात प्रस्थान केले, राजकार्यकरण्यासाठी.

मात्र कोणाचेही लक्ष लागत नव्हते, राज कार्यात. आपल्या पतीचे लक्ष आपल्या कर्तव्य-कर्मात नाही, हे पाहून पांचालीने विचारले, “आर्य? काय झाले? आपले लक्ष कार्यात नाही वाटते!”

“आम्ही म्हणतो आहोत, कदाचित आमचे पुत्र, नाहीतर कौरव आता जिवित असायला हवे होते!” नकुलाने असोशीने म्हटले, “आपल्या पुत्रांना आनंद झाला असता, तर कौरव मत्सराच्या अग्नीत दग्ध झाले असते!”

“तू उचित म्हटलेस नकुला! मात्र द्रौपदीची विटंबना- वस्त्रहरण करणाऱ्या त्या नराधमांना आपण जिवंत सोडले असते, तर द्रौपदीच्या चारित्र्यावर अधिक लांछने लागली असती व आपल्या सर्वांच्या पराक्रमाचाही उपहास झाला असता.” भीमसेनाने म्हटले.

“मात्र मला विरक्त वाटते आहे. जर आपला हा विजय पाहण्याकरिता कोणी विशेष राजे जिवित नव्हेतच, तर या विजयाला- राज्यपदाला काय अर्थ?” युधिष्ठिराचे तेच शब्द.

“खरंतर पितृछत्र -मातृछत्र हरपल्यानंतर आपल्या सर्वांना या परिवर्तनशील, मायावी आणि नश्यमान विश्वाची सत्यता पटायला हवी होती. मात्र सत्ता आणि राज्याच्या

अधिकाराने विश्वाच्या भ्रामकतेत आपले चरणतल रोवून ठेवले. म्हणूनच कमळ ज्याप्रमाणे पंकातही अलिप्त असते, त्याप्रमाणे आपले मनही भोगविलासांमध्ये रत असूनही विरक्त असावेत.” सहदेवाचा मार्मिक उपदेश.

“तुझे शब्द उचित असले, तरी आपण या भोगविलासा पासून कधीपर्यंत अलिप्त राहू शकतो? याशिवाय ज्याप्रमाणे विश्व परिवर्तनशील आहे त्याप्रमाणेच हे मनही मायिन असून यातील भावभावना ही परिवर्तनीय आहे. ही विरक्ती- औदासिन्यातून निर्माण झाली असेल- तीही नष्ट पावणारी आहे. काही क्षणांसाठी उद्भवणारी मोक्षाची इच्छा प्रत्येक मनुष्याला मुमुक्षू बनवत नसते आणि याशिवाय नरजन्म हा अत्यंत दुर्लभ असतो. तो फक्त सुखाने- आनंदाने जगला पाहिजे. या जीवनातील प्रत्येक क्षण अनमोल असतो, म्हणूनच मी प्रत्येक क्षण हर्षोल्लास आणि भोग विलासात व्यतीत करेन.” सदैव ईश्वरध्यासाची इच्छा धरून ऋषी

शौनकांचे विचार बाळगणाऱ्या अर्जुनाने आज अकस्मात चार्वाकाचे विचार उचलून धरले होते.

"अर्जुना, मात्र तुझ्या मोक्षाच्या इच्छेचे काय?" सहदेवाने द्रौपदीच्या मनातलाच प्रश्न विचारला. कारण द्रौपदीला आश्चर्य वाटले होते, सदैव (वनवासात) तपोरत असणाऱ्या आणि अन्य काळातही भौतिक सुखापेक्षा अधिक काय आहे का, हयाचा सतत शोध घेणाऱ्या जिज्ञासू पार्थराजांना अशी कशी दुर्बुद्धी झाली? त्यांनाच तर कृष्णाने वेदोपनिषदांचे कथन करुन आपल्या विश्वरुप-दैवी स्वरुपाचे दर्शन घडविले, याशिवाय युद्धकाळात त्यांची तसेच त्यांच्या अश्वाचीही सेवा केशवानेच केली होती, कारण ते तितक्याच योग्यतेचे होते.

"आर्यपुत्र, आपणास हे कसे विस्मृत घडले, की जीवात्माचे श्रेयस व प्रेयस परमात्म्यात विलिन होण्यातच असते? आत्मा हा अछेदय, अविभेदय, अदाहशील तसेच

जलप्रेरक असतो? जीवनात विपदा -अभ्युदय असतांही मनुष्याने स्थितप्रज्ञ राहावे? मनुष्याने स्वतःच्या सत्त्वाचा शोध घेणेच जीवनध्येय मानावे?; कर्मयोग श्रेष्ठ असून मनुष्याने निष्काम भावनेने कर्म करावे? मी म्हणजेच हा जीवात्मा स्वयं परमात्माच असतो?" पांचालीने खिन्नतेने म्हटले, "याशिवाय स्त्रियांमध्ये मेधा, धृति, दुर्गा, क्षमा, श्रुती, कीर्ती मीच आहे. पांडवांमध्ये अर्जुन आहे, ह्या कृष्णवचनाचे विस्मरण घडले का आपणांस?" असे म्हणून ती शांत झाली.

"तूच कथन केले होतेस आम्हांला, कृष्ण तर आकाशापेक्षा अधिक उंच झाला होता, उत्तुंग झाला होता, त्याच्या मुखातून ज्वाळा बाहेर पडत होत्या. आकाश हे त्याचे मस्तक, तर भूमी त्याचे चरण. त्याच्या डाव्या बाहूपासून बलदेव, तर उजव्या बाहूतून तू स्वतः उत्पन्न झाला होतास. त्याच्या दोन्ही हातातून तेजस्विनी ऋतानृता

व सुभद्रा प्रकट झाल्या होत्या. त्याच्या स्कंधात, वक्षावर दिक्पाल होते.” सहदेवाने म्हटले.

“प्रथम आम्ही यावर विश्वास ठेवला नाही, जो कोणत्याही परिस्थितीप्रमाणे, बालकाप्रमाणे सहज असतो, हास्यविनोद करत असतो, त्याचे इतके विशाल विश्वरूप कसे असू शकते? नकुलाने म्हटले.

“तेही ते विश्वरुप विसरलास का तू?”

“कृष्णाने म्हटले होते की मोक्ष हा शारीरिक स्तरावरचा नसून आत्मिक स्तरावरचा असतो. जो त्याच्या विश्व रूपाचे दर्शन घेतो, त्या व्यक्तीला मोक्ष प्राप्त होतो.” अर्जुनाने म्हटले.

“तुला असे वाटते का? तू मोक्ष प्राप्त केलास? नाही, कृष्णाने जे कथन केले, ते तुला विस्मृत झालं का? सरुपता, सलोकता, समीपता आणि सायुज्य, या चार मुक्ती आहेत. यातील फक्त तीनच मुक्ती तुला प्राप्त आहेत. मात्र सायुज्याच्या मार्गावर तू अजूनही चालत आहेस, त्याचे

तुला विस्मरण घडून चालणार नाही. तू हेच लक्षात ठेव, मनुष्य हा आमरण अध्येतावृत्ती धारणा प्रवृत्त असला पाहिजे. मीही परमविद्वान व त्रिकालदर्शी पुरुष असूनही मीही अध्येताच आहे.” सहदेवाने म्हटले, “हे पार्था!”

“सहदेवा, ज्याच्या सखा विश्वरूप विराट पुरुष कृष्ण आहे आणि त्याच कृष्णाने ज्याला सांगितले असेल, “मी पांडवांमध्ये अर्जुन तसेच यादवांमध्ये कृष्ण व अर्जुन शिष्य सात्यकीही आहे. याच्यात अर्थ तो हाच नरश्रेष्ठी अर्जुन-पार्थ स्वयं कृष्ण नसेल का? म्हणजेच सायुज्य मला प्राप्त झाली आहे. याशिवाय ही संपत्ती आपण पराक्रमाने आणि युद्धात प्राप्त केलेली आहे. आपण सर्वच म्हणता की आपण या संपत्तीचा, साम्राज्याचा उपभोग घेतला आहे! मला मान्य आहे, की आपण आपल्या प्रियजनांच्या रक्तपातापासून आरक्त झालेल्या राज्याचा, धनाचा उपभोग घेणे आपल्याला अन्यायकारक वाटेल, पांचाली, कृष्णे! तर या

भोगामध्ये काय अनुचित आहे?" अर्जुनाने पांचालीला प्रश्न केला.

"प्रश्न या भोगविलासाचा नव्हे, तर आपल्या परिवर्तित झालेल्या विचार धारेचा व कृष्णाच्या विशेष -गेय उपदेशाचा आहे. आपली विचारधारणा अकस्मात कशी बदलली? कदाचित कालाच्या आवश्यकतेकारणे. मात्र कृष्णाने जे कथन केले आहे, ते लक्षात असू द्या, ज्याप्रमाणे पंकात उमलणारे कमलही पंकापासून लिप्त नसते, त्याप्रमाणेच कर्मयोगी भोगविलासात व कर्मांमध्ये भोकृत्व-कर्तृत्व स्वतःकडे न घेता परमेश्वराकडे सोपवत असतो!" पांचालीच्या शब्दांवर अर्जुनाने म्हटले, "अवश्य, कृष्णे! जर येथे सखा असता, तर त्याने हेच कथन केले असते!"

"**नी**लांगिनी प्रिय पांचाली! हे तुझ्या करिता!" नकुलाने पांचालीला सुभ्रदाप्रमाणे तरल आणि सूर्यबिंबाप्रमाणे आरक्त असणारी अंशुके दाखवली.

"आणि आपणाकरिता?" तिचा प्रश्न. यावर नकुलाचे नेत्र सजल झाले. त्याने मद्रदेशाची त्याच प्रकारची सौंदर्य प्रसाधने दाखवली, ज्या प्रकारची सौंदर्य प्रसाधने त्याची माता माद्री उपयोग करत होती. "कृष्णे, हे माझ्या अरुण मातृलाने दिले आहे. राजसूय यज्ञावेळी दिग्विजयालाही मातेला प्रिय असणारी वस्त्रे आणि रत्ने त्यानेच मला प्रदान केली होती. त्याला मातेच्या स्मृती प्राप्त झाल्या आहेत." नकुलाच्या शब्दांवर पांचालीने विचारले, "पांचालदेशाहून काही आणले आहे का?" तत्क्षणीच एक प्रहरी कक्षात

प्रवेशला, “महाराज धृतराष्ट्र, गांधारी (राजमाता) वानप्रस्थान करणार आहेत. राजमाता कुंतीही त्यांच्यासह आहेत.”

“काही क्षणांची प्रतिक्षा करावी. मी आपल्या पत्नीसह -अग्निसुतेसह मुख्य प्रदोष भवनात काही समयाने निश्चितच प्रस्थान करेन.” असे म्हणत नकुलाने पांचालीला एक मंजुषा दिली, “यात काय आहे, आर्य?” पांचालीने प्रश्न विचारला, त्यावर नकुलाने म्हटले, “पांचाली, तुला प्रिय असलेले शंख- प्रवाळांचे अलंकार आणि शोभेच्या वस्तू या मंजूषेत आहेत. ज्याक्षणापासून जलजीवनवस्तूप्रिय असलेल्या आम्ही पांडवांनी पा्ंचालदेशात निवास करण्यास आरंभ केला होता, त्याक्षणापासून या वस्तू पांचालदेशात निर्माण होऊ लागल्या होत्या. कारण आम्हांला जलजत्व प्रिय होते, याशिवाय जलाशयातील प्रवाळे, शंख -शिंपले, मौक्तिक आणि जलील रत्ने आदि जलजीवरत्नेही आम्हांलाही प्रिय आहेत. म्हणूनच इंद्रप्रस्थात, बृहदप्रस्थान आणि

माकन्दीमध्ये आम्हांला प्रिय वाटणाऱ्या या रत्नांचीच पण्यागारे होती, पांचाली!" नकुलाने स्मरणमात्र मंदस्मित केले.

"मात्र परीक्षिताचे , आम्हां सर्व स्नुषांचे आणि राजमाता कुंतीदेवीचे काय?" पांचालीने चिंतेने म्हटले, "परीक्षिताला राजमातांच्या सहवासाची सवय आहे! याखेरीज राजमातांनी आयुष्यभर कष्ट -पीडा सहन केली आहे. त्यांनी अनंत वनवास भोगला आहे. त्यांना रोखणे आवश्यक आहे!"

"नीलांगिनी, आपण सर्वजण आपल्या राजमातांना फक्त विनंती करु शकतो, त्यांना रोखणे आपल्यालाही शक्य नाही. कारण त्या बालवयात असल्यापासून महाराज कुंतीभोज तसेच वसुदेव त्यानंतर पिताश्री, माझी माता -माद्री आणि आम्ही सर्वांनी राजमातांच्या निग्रही-दुराग्रही स्वभावाचा अनुभव घेतला आहे. जर त्यांनी एखादे कर्म

करण्याच्या निश्चय केला, तर त्यांना रोखणे असंभव असते.” असे म्हणून नकुलाने पांचालीसह प्रदोषस्थानी प्रस्थान केले.

तेथे राजमाता, कुंती, महामंत्री विदुर, त्याची पत्नी पार्श्वती, धृतराष्ट्र व गांधारी होते. युधिष्ठिर, भीम, अर्जुन, सहदेव आणि सुभद्रा, विजया, बलंधरा या अन्य पांडव स्त्रिया (करेणुमती, देविका, पौरवी) तसेच सविता, सारिका, पुरुष्णी, वसुंधरा व भानुमती अशा कौरव स्त्रिया त्यांना रोखण्याचा प्रयत्न करत होत्या. भीम, अर्जुन व सहदेव तसेच पांडवस्त्रिया फक्त राजमाता व विदुराला रोखू पाहत होत्या, तर युधिष्ठिर व कौरव स्त्रिया धृतराष्ट्र -गांधारीला रोखू पाहत होते.

“माते, तुम्ही का आमचा त्याग करताहात? काकाश्री विदुर, आपणही? आपण आमची इतकी साथ दिली, आम्हांला तुम्ही लाक्षागृह, द्युत, खांडवप्रस्थ, वस्त्रहरण आणि अनेक संकटातून बाहेर काढलेत, आता तुम्ही या

पितृहिन बालकांना अनाथ करु इच्छिता का? राजमाते, आम्हांला तुमचाच आधार होता! तेही छत्र आपण हिरावून घेणार आहात का, राजा धृतराष्ट्र?" सहदेवाने कुंतीला रोखण्यासाठी तिला दृढ आलिंगन दिले.

"राजमाता, आपण आयुष्यभर वनवास भोगलाहात. आपण अत्यंत दुःख सहन केले आहे. आपण माझी माता आहात. मी आपणांस असे वनगमन करु देणार नाही. कारण हे राज्य, ही संपत्ती, धन-सामाज्य तुमचेच आहे. त्याकारणे तुम्ही महाराजांसह वानप्रस्थान करण्याचे कारणच नाही." पांचालीने कुंतीचा कृश बाहू दृढपणे धरला.

"पांचाली, मी तर अनेक पीडा सहन केल्या आहेत. किंतु माझ्याकारणे आणि माझ्या पुत्रांकारणे तू अनंत दुःख, अपमान आणि समाजाचे कटाक्ष झेलले आहेत. त्याकारणे तू मला पुनश्च क्षमा कर."कुंतीने सहदेव व पांचालीला जवळ घेतले, "पुत्रहो आणि पुत्रवधूहो! मी माझ्या पतीसह

असताना विभिन्न प्रकारचे सुखोपभोग भोगले आहेत. त्याकारणे वनात गमन करुन तपस्या करणेच श्रेयस्कर आहे. म्हणूनच तुम्ही सर्वजण ज्येष्ठ पांडववधू पांचालीसह धर्म व सत्याने राज्य करावे व राजकार्ये पूर्ण करावीत.” “देवी!” पांचाली इतकेच बोलू शकली.

“पुत्रांनो! तुम्ही माझ्या पुत्रांचे -जामाताचे श्राद्ध केलेत, त्याकरिता माझे पितृहदय ऋणी असेल, किंतु मला स्वतःला कुरुपुत्राचे श्राद्ध करायचे आहे. मला यथेच्छ धन द्यावे.” धृतराष्ट्राने विनंती केली.

“मला श्राद्ध करण्यासाठी धनाची आवश्यकता आहे.”

गांधारही समृद्ध राज्य आहे.” एकाच समयी पांडव आणि कुरुवंशाला धारेवर धरत गांधारीने म्हटले, “युधिष्ठिराकडे धनाची याचना का करताहात?”

“तुझ्या कुपुत्रांचे आणि द्रौपदीहरण -अभिमन्यूच्या प्राणांना गिळंकृत करणाऱ्या जयद्रथाचे-तुमच्या जामाताचे

श्राद्ध करण्यासाठी आम्ही धन का देऊ? तुझ्या पुत्रांनी आमचा अपमान वारंवार केला होता, आमच्या विरुद्ध कटकारस्थाने रचली होती, त्यांनी आमच्या प्राणप्रियेची विटंबना केली होती, त्यांची श्राध्दे आम्ही केलीत. तेवढ्यात समाधान मानून घ्या. अधिक धनाची याचना करु नका." भीमाने क्रोधाने म्हटले. त्याचे शब्द अत्यंत कठोर होते.

"पुत्रा, या उभयंताना धन घेऊ द्या. श्राद्ध केल्याकारणे त्यांना संतुष्टता वाटेल की फक्त त्यांचेच पुत्र स्वर्गास प्रयाण करते झाले आहेत. अन्य योध्दे नव्हे." कुंतीने उपरोधाने म्हटले.

तिच्या आज्ञेनुरुप युधिष्ठिराने त्या उभयंतांना यथेष्ट धन प्रदान केले.

# अष्टम बंध

प्रपितामही!" परीक्षित युवावस्थेकडे अग्रेसर असलेला किशोर असूनही पांचालीच्या वस्त्राचे टोक धरुन तिच्यामागे धावत होता. तत्क्षणी अर्जुनाने त्याला अलगद धरले, "पितामह ! पितामह! असे म्हणून परीक्षिताने त्याचा कंठहार धरला.

"पितामह अर्जुनांच्या स्कंधावरुन उतर, परीक्षिता! तू बालक राहीला नाहीस.." द्रौपदीने परीक्षिताला दटावले.

"अगं, श्रुतकर्मा-अभिमन्यू बालक असताना आपण त्यांना उचलून धरले नव्हते का?" अर्जुनाने परीक्षिताला उतरविले, "आणि कृष्णे, निष्कारण मला पितामह म्हणून माझ्या चिरतारुण्याला वार्ध्यक्याकडे झुकवू नकोस."

“मात्र परीक्षित आता वयात येत चालला आहे. तसेच हस्तिनावतीचा भावी नरेश व युवराजही आहे. त्याला दायित्वाची जाणीव व्हायला हवी.” पांचालीने म्हटले, तसे अर्जुनाने तिच्या शब्दांचा विरोध केला, “एखाद्या पितामहीला शोभावे असे तुझे आचरण मुळीच नव्हेच. तू पितामहीला न शोभणाऱ्या कठोरपणाने आचरण करत आहेस, कृष्णे!”

“तरीही मला पितामहीच प्रिय आहे.” परीक्षिताने पांचालीच्या कटीला आलिंगन दिले, “आणि तुम्हीही, पितामह अर्जुन! मी पिताश्रींचा सहवास कधीच अनुभवला नाही, तरीही मला त्याचे दुःख नाही, कारण तुम्ही सर्वजण पितामह माझ्यावर प्रेमाचा अखंड वर्षाव करत आहात.”

“पितामही तुझ्याशी निर्बंधतेने आचरण करते तरीही? पितामही कठोरपणे आचरण करते तरीही?” अर्जुनाने विचारले.

“मला त्याचे कारण ज्ञात नाही. परीक्षिताचे उत्तर!

“आर्यपुत्र, असे कारण असेल की परीक्षिताचे प्राण कृष्णानेच रक्षिले, त्याकारणे त्याचे सखी-सखा या नात्याने आपण त्याला प्रिय असू.” पांचालीने वेध घेतला.

“मात्र प्रपितामही राजमाता कुंती कुठे आहेत? मला त्यांना भेटायचे आहे. मला त्यांच्या मुखातून सुरस कथा श्रवण करायच्या आहेत.” परीक्षिताने आग्रह धरला.

“त्याकरिता ज्येष्ठ पितामह धर्मराजांची अनुमती घ्यावी लागेल.” अर्जुनाने म्हटले.

“मी विनंती अथवा दुराग्रह केल्यानंतर ते अवश्य संमती देतील.” परीक्षित युधिष्ठिराच्या कक्षाकडे धावला.

“आर्य, मलाही राजमाता कुंती देवीची सेवा करावीशी वाटते. कारण वनवासाने ती संधी दिलीच नव्हती.” पांचाली भावुक झाली.

आणि तिची इच्छा पूर्ण झालीही. तिने पाचही पांडवासह उलूपी, सुभद्रा, चित्रगंदा, करेणुमती, विजया आदि पांडव स्त्रियांसह व परीक्षितासह महर्षी शतयूपांच्या आश्रमात प्रस्थान केले.

पांडुपुत्र राजमाता कुंती व शतयूपाला भेटून अत्यानंदित झाले.

“शतयूपा! शत यूप उभारुन यज्ञ करणारा तू आणि आम्हांला युध्दात सहाय्य करणारा तू, अकस्मात संन्यस्त का झालास व आपल्या केकेयराजकुमारांना राज्य देऊन वनात का आलास?”

“पांडुपुत्रहो! या युध्दात माझे प्राणरक्षण झाले, माझ्या पुत्रासह. मात्र मला कळले होते, हे जीवन किती अशाश्वत व नाशवंत आहे, त्याकारणे मी वनाचा मार्ग धरला.” शतयूपाचे उत्तर. यावर अर्जुन निराश झाला, “मलाही वनात तपस्या करावीशी वाटते, परंतु कर्तव्यातच तपस्या

सामावलेली असते, असे कृष्णाचे म्हणणे आहे. सहदेवही हेच सांगत असतो, राजकार्याचा त्याग करुन वनात पलायन करण्याऱ्या राजाचे स्थान नरकात असते. याशिवाय परीक्षित युवराज आणि सम्राट बनण्यायोग्य होत नाही, तोपर्यंत तरी आम्हांला राजकार्यालाच तपस्या मानावी लागते आहे.” कृष्ण व पांचालीच्या उपदेशानंतर अर्जुनाच्या विचारांत परीवर्तन घडले होते.

“पुत्रा, परीक्षित! हे महर्षी शतयूप! यांचे चरण शिव!” युधिष्ठिराची आज्ञा मान्य करत परीक्षिताने शतयूपाचे चरण शिवले. त्याच्याकडे पाहून शतयूपाच्या मनात विचित्र विचार तरळले, त्याचे भविष्य पाहून.

“मला सहदेव, अर्जुन आणि देवी द्रौपदीसह एकांतात बोलायचे आहे. आपण सर्वांनी कुरुज्येष्ठासह कुटीत प्रस्थान करावे.” शतयूपाच्या शब्दांवर पांडव अचंबित झाले. तरीही

त्याची आज्ञा मानत अन्य पांडुपुत्र परीक्षिताला घेऊन कुंतीच्या कुटीत गेले.

तसे शंकित झालेले अर्जुन, द्रौपदी व सहदेव शतयूपाजवळ आसनस्थ झाले.

“काय झाले, शतयूपा? तू परीक्षाताचे भविष्य पाहिलेस का?” सहदेवाचा प्रश्न.

“काय? अर्जुन चकित व भयभीतही झाला, “काय आहे आमच्या प्रिय पौत्राचे भविष्य?”

“त्याला क्रोध व अहंकार या विकारांपासून दूर ठेवा!” शतयूपाचा परामर्श.

“का? तो तर भावी क्षत्रियसम्राट आहे, त्याकारणे त्याला ह्या विकारांची आवश्यकताच आहे.” अर्जुनाने ठामपणे म्हटले.

“त्याकारणे म्हणजे त्या विकारांकारणे परीक्षिताचा अपमृत्यू होण्याची संभाव्यता आहे! सहदेव नकळत

उद्गारला. त्याचे शब्द ऐकून द्रौपदीला धक्का बसला, “आर्य!”

“सहदेवा!” अर्जुन कडाडला, “तू माझ्या पौत्राविषयी अशुभ उद्गार काढू नकोस. अन्यथा!” अर्जुनाने तलवार उपसली खरी, मात्र पांचालीने त्याला रोखले.

“आर्यपुत्र, शांत व्हावे!” पांचालीने त्याची तलवार रोखत त्याला शांत केले.

“आर्यपुत्र सहदेव आपले कनिष्ठ भ्राता आहेत. त्यांच्यावर असे क्रुद्ध होऊ नये. आणि त्यांच्या शब्दांत निश्चितच तथ्य असेल. कारण ते त्रिकालदर्शी तसेच भविष्यज्ञाताही आहेत. म्हणूनच मला याचा संकेत महर्षी व्यासांनी पूर्वीच दिला होता. त्याकारणे मी परीक्षिताच्या विचारांवर, कृती वर नैतिक बंधने घालू पाहत होते. त्याचे दुराग्रह पूर्ण होऊ न देता त्याला क्रोध व अहंकारग्रस्त होऊ

देत नव्हते.” पांचालीचे शब्द ऐकून अर्जुन चकित झाला, “कृष्णे? तू हे आम्हांला का कथन केले नाहीस?”

“आपण माझ्याप्रमाणेच या युध्दात स्वजनांच्या मृत्यूचे दुःख सहन केलेत. त्याकारणे परीक्षिताच्या जन्मानंतर आपणाला इतका आनंद झाला होता की, मला आपल्या आनंदावर विरजण घालायचे नव्हते. मला आयुष्याच्या या उत्तरार्धात आपणा सर्वांना दुःखी पाहायचे नव्हते. कारण आपण अनंत संघर्षानंतर हे सुख प्राप्त केले होते व अनंत दु:खानंतरही.” पांचाली भावूक झाली, “म्हणूनच आर्य, मी आपल्या आनंदात बाधा नाही टाकली!”

“कृष्णे!” अर्जुन प्रभावित झाला.

"पुत्रा! ही शक्ती आणि हे माझे आत्मपुण्य ग्रहण कर व पाची पांडव व त्यांच्या स्त्रिया -पौत्रांमध्ये हे विभाजित कर, जेणेकरून पांडव व पांचाली स्वर्गारोहण करणे दुष्कर ठरणार नाही!"विदुर कपित्थ वृक्षाखाली आसनस्थ होता. त्याने आपला कृश हात युधिष्ठिराच्या मस्तकावर ठेवला होता. युधिष्ठिरासह चारही पांडव -द्रौपदीही होते. ते सर्वजण दुःखी होते. कारण हस्तिनापूराचा मंत्री असूनही ज्या विदुराने त्यांना साहाय्य वारंवार केले होते, तोच विदुर त्या सर्वांना सोडून परलोकी प्रस्थान करणार होता.

"आपण आमच्यावरचे पितृछत्र होता. आता आम्ही निश्चित यथार्थाने अनाथ होऊ." अर्जुनाने दुःखाने म्हटले.

“आज ना उद्या प्रत्येकाला देह त्याग करायचाच असतो! त्याकरिता शोक कशाला? याशिवाय आपणा सर्वांचे अर्थात पांडु पुत्राचे जीवन समाप्त होत चाललेले आहे. त्याकारणे आपले आधार, मित्र, सखा, बंधु हळूहळू आपल्या हातून निसटत चालले आहेत. आपले पितृछत्र-मातृछत्र कधीच हरपले होते, त्यानंतर पुत्रांचा व मित्रांचा कधीच मृत्यू झाला आहे. त्याकाराने मोह कशाला हवा?” सहदेवाने असे म्हटले खरे, तरी त्याचे मनही भावुक झाले होते.

“पुत्रहो! पुत्रवधू! सर्वच काही निसटणार नाही. स्वतःची सत्कर्मे- दुष्कर्मे, पुण्य- पापे व इच्छा कधीच निसटत नाही.” विदुराने विश्वासाने म्हटले.

“मात्र माझ्या मनात एक इच्छा, महत्त्वकांक्षा आहे की मला सदेह स्वर्गारोहण करायचे आहे.” धर्मराज युधिष्ठिराने म्हटले, “मी धर्मराज आहे. मी विभिन्न शास्त्रांचा ज्ञाता आहे.

मी अनेक पुण्य कर्म केली आहेत. मी यज्ञ केले आहेत, दाने दिली आहेत. सदैव क्षमा, सत्य, अहिंसा, धर्म व शांती या तत्त्वांचे पालन केले आहे. त्याकारणे मला सदेह स्वर्ग प्राप्त होईलच, यात काहीच शंका नाही.''

यावर विदुराने हसून म्हटले, ''नियती अत्यंत शक्तिशाली आहे. तिच्या खेळ गहन आहे.'' असे अंतिम वाक्य बोलून विदुराने आपली शक्ती युधिष्ठिराला प्रदान केली व देह त्याग केला.

''तातश्री......काकाश्री!'' पांडुपुत्रांच्या मुखातून एकच उद्गार निघाला, क्षणार्धात विदुराचा देह निष्प्राण झाला होता, ते पाहून सर्व पांडव शोकांत झाले. त्यांना पांचालीने सावरत म्हटले, ''आर्यपुत्र! कृपया स्वतःला सावरावे. आपल्यालाही याच दिशेने प्रस्थान करायचे आहे.''

''आणि मलाही!'' अकस्मात मागून एक सुसज्ज स्वर आला तसे पांडव व द्रौपदी चकित झाले. त्यांनी मागे वळून

पाहिले हेच शब्द कुंतीने म्हटले होते. तिला विदुराचा देह त्याग सहन झाला नव्हता. त्याकारणाने तिला विरक्त वाटू लागले होते. कारण विदुरानेच सदैवच तिला तसेच तिच्या पुत्रांना संकटातून बाहेर काढले होते.

“माते, आमच्या हातून अपराध झाला असेल, तर आम्हाला क्षमा करा, मातोश्री! आमचा त्याग करू नका.” सहदेव त्याच्या नकळत भावुक झाला.

“सहदेवा, भावुक होऊ नकोस! तू सर्वज्ञाता आहेस. तू आपल्या मोहाचा त्याग करावास. तेच उचित ठरेल. तुम्ही सर्वजण माझे देवदत्त पुत्र आहात, जे मंत्रबीजापासून मी व माद्रीने सामर्थ्याने उत्पन्न केले होते. हस्तिनापुर व इंद्रप्रस्थ, त्यानंतर समग्र आर्यावर्ताचे राजमातृपद माझे होते, गांधारी पराजितांची माता ठरली व मी वीरमाता, विजयी वीरांचे माता ठरले. हे सर्व काही माझेच होते, माझ्या पौत्रांना वीरगती प्राप्त झाली असली, तरी माझे प्रपौत्रजीवित होते!”

कुंतीने म्हटले, “मी कितीही प्रौढी मिरवली होती गांधारीसमोर ज्याप्रमाणे पूर्वी गांधारी आपल्या पुत्रांची माझ्यापुढे मिरवायची. मी आताही त्याच करिता वनगमन केले होते. मात्र मला आता कळले आहे की तो माझ्या भ्रम होता. ‘मी',‘माझे' असे फक्त कर्म असते, पुण्य असते अथवा आत्मसंबंध असतो.”

कुंतीच्या शब्दांनी पांडव चकित झाले. जी स्त्री आपल्या आणि स्वजनांच्या महत्वाकांक्षाने प्रेरीत होऊन संघर्षावर विश्वास करत होती, त्या स्त्रीच्या मुखात विरक्ती, निर्मोही आणि पुण्याचे -आत्मसंबंधाचे संभाषण?

“आपण या रुपात आमच्या माता नाहीत, आपण महाराज पांडुची स्त्री नव्हेत अथवा परीक्षिताची प्रपितामही नव्हेत. हे तुमचे रुप अनपेक्षित, असाहक व विभिन्न आहे.” भीमाने म्हटले, “या रुपात आपल्याला पाहणे आम्हांला शक्य होत नाही. अकस्मात तुमचा स्वभाव कसा बदलला,

राजमाता?" यावर कुंतीने हसून म्हटले, "राजमाता नव्हे, माता! माझा सत्य परिचय राजमाता नव्हे, तर गणेश पत्नी सिध्दी आणि माद्रीचे मूलस्थान सिध्दीची भगिनी धृतिका होते."

"माते?" पांडव चकित झाले.

"हे सत्य आहे, पुत्रहो! तुमचा धर्म पिता अरिष्टपुत्र प्रतिहंसक गंधर्व होता, तर अंध नरेशाचे सत्य रुप हंस गंधर्व आहे, जो प्रतिहंसकाचा भ्राता होता. गांधारीचे मूलस्थान मति असले, तरी तिची मति महत्वाकांक्षाकारणे अंध झाली होती, त्याचे प्रतिक म्हणून मतिने नेत्रावर पट्टी बांधून सदैवच एकांगीच विचार केला." कुंतीने सविस्तर कथन केले." महर्षी शतयूपाने हे सर्व आम्हांला कथन केले होते."

"आणि आमचे प्रिय काकाश्री यमाचा अंश, तर गुरुदेव, द्रोण बृहस्पतिचा अंश होते." अर्जुनाने दुःखाने म्हटले, "ते पुनश्च त्या उभयंतामध्ये विलीन झाले असतील."

"मला वाटते, पुत्रहो! सिध्दीलोक माझ्या प्रतिक्षेत आहे आणि मी तिची अपराधिनी आहे, मी जिला माझ्या पतिच्या मृत्यूचा संपूर्ण दोष दिला, माझ्यामुळे -कारणे जिचे जुळे पुत्र अनाथ झाले, ती माद्री म्हणजे धृतिका माझी प्रतीक्षेत आहे." कुंतीने प्रभावित होऊन म्हटले. तिचे नेत्र पूर्वेला रोखून होते.

"राजमाते, मृत्यूचे रुप कुणालाही कधीच प्रिय वाटत नसते. कारण मृत्यू कधी कधी व्यक्तीला त्याच्या अनुचित कर्माची शिक्षा देत असतो!" सहदेवाच्या संकेतावर द्रौपदी चकित झाली, "राजमातांनी आजपर्यंत कुठले अनुचित कर्म केले आहे,का?"

"राजमाते, आपण लाक्षागृहाच्या घटनांपासून सर्व काही स्मरण करावे!" सहदेवाने गूढार्थाने म्हटले.

“**य**थार्थात मी पातक केले आहे. मी असे करायला नको हवे होते. मी त्या निरपराध स्त्रीला पाच पुत्रांसह मदिरा प्रदान करुन यदि लाक्षागृहात अडकून ठेवले नसते आणि माझे-माझ्या पुत्रांचे प्राण रक्षिण्यासाठी तिचा-तिच्या पुत्रांच्या मृत शवांचा प्रयोग केला नसता, तर मी या भयावह अग्निमध्ये अडकून त्या स्त्रीप्रमाणे माझ्यावर अशी मृत्यूची घटिका आलीच नसती.” कुंती पश्चातापाच्या आणि अरण्यातील अग्निमध्ये जळत होती. तिच्यासमोरच असलेल्या वृक्षाच्या पारावर असलेले धृतराष्ट्र व गांधारी यांना अग्निचा गंध जाणवू लागला होता.

"अग्नि.......... अग्नि! कृपया आमचे रक्षण करा, या दावानालापासून! पूर्वी कुरुकुलाला अग्निशिखेचे भय भेडसावत होते. आता तिच्याच जनकाचे अग्निचे कुरुकलाच्या ज्येष्ठ नरेश असलेल्या आम्हांस भय वाटते आहे!" धृतराष्ट्र सेवकांना हाकारत होता, "सेवकहो! आमचे रक्षण करा! या अग्निपासून! हा अग्नी विझवा!" "हा अग्नि विझणे शक्य नाही. कारण महाराज, आपण व आपल्या भ्रात्याने हाच अग्नि प्रज्वलित केला होता. त्यानंतर मी व कुंतीने, आपल्या पुत्रांनी व पांडुपुत्रांनी ह्या अग्निचे वहन केले होते. याशिवाय त्या अग्निशिखेने आमच्या पुत्रांचा अंत केला, आता तिचाच पिता -हा अग्नि आपला अंत करु पाहत आहे." गांधारी पांचालीला दोष देत होती. याशिवाय त्या अग्निशिखेने द्रुपदकन्येने आमच्या पुत्रांना अंत केला होता -नव्हे, पांडुपुत्रांकरवे करवून घेतला होता. आता तिचाच जनक -पिता- हा अग्नि आमचा अंत करु पाहत आहे." गांधारी आधी धृतराष्ट्र -पांडुला, तर

आता पांचालीला दोष देत होती. मात्र अग्नि त्यांच्या जवळ जवळ येत होता. त्याच्या उष्णतेची झळ त्यांना लागत होती.

अग्निच्या प्रहाराकारणे, वस्त्रांचे एक -एक अग्र जळत होते अन् गळून पडत होते. हातांची त्वचा ज्वाळांकारणे जळत होती, त्वचेचे आणि वस्त्रांचे पापुद्रे पडत होते. त्या एकाकी वनात त्या तिघांचा आक्रोश गुंजत होता, वेदनांनी भरलेला.

“आह.......!” दीप प्रज्वलित करताना पांचालीच्या हाताला चटका बसला. तिने वर्त्तिका प्रज्वलित केली असता, त्या वर्त्तिकेच्या उष्णतेची झळ तिच्या हातालाही बसली, तिचे एक बोट काळे पडले होते.

“आर्यपुत्र!” असे म्हणून पांचालीने आपल्या बोटावर फुंकर घातली. “ऋतानृते!” सहदेवाने तिच्या बोटांना शीतल जलाच्या पात्रात घातले, “हे तर संकेत आहेत,

राजमातेवरील संकटाचे! अन्यथा तू अग्निकन्या असल्याकारणे अग्नि तूला क्षति पोहचवू शकत नाही.”

“आर्यपुत्र! तर आपण आपले दूत अवश्य शतयूपांच्या आश्रमात धाडले पाहिजेत.” पांचालीने म्हटले.

“अवश्य, ऋतानृते!” असे म्हणून सहदेवाने संध्यासमयीच वेळ न दवडता दूत व सैनिक धाडले, शतयूपाच्या आश्रमात!

“असे काय झाले, सहदेवा?” नकुल आपल्या रत्नमंचकावरुन उठला. त्याच्या प्रश्नावर सहदेवाने गांभीर्याने म्हटले, “नकुला, आपली माता संकटात आहे रे! मला ज्ञात आहे, तिचे रक्षण असंभव आहे, मात्र पुत्र या नात्याने तिच्या अंतिम समयी उपस्थित राहणे आपल्या सर्वांस अपरिहार्य आहे. तू अन्य भ्रात्यांना सूचित कर.”

नकुलाने त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवत अन्य पांडवांना सूचित केले. अन्य पांडवांनी ते जाणून रथ सज्ज

केले व त्या सर्वजणांनी पांचालीसह वनात गमन केले. मात्र तत्पूर्वीच कुंती, गांधारी व धृतराष्ट्राचा जळून मृत्यू झाला होता.

पांडवांचे रथ ज्याक्षणी वनात पोहोचले, त्याक्षणी त्यांना दिसला, तो दावानल, वनातील वस्तूंची राख, प्राण्यांचे कंकाल, कुंती -गांधारी-धृतराष्टाची जळलेली शरीरे. ते पाहून पांडव शोकमग्न झाले, मात्रा त्यांना अजून दुःख भोगायचे होते.......

# नवम बंध

"**मी** पूर्वी स्वतः विषयी किती अहंकार बाळगायचो, मी किती सामर्थ्यशाली आहे, मी सर्वश्रेष्ठ धनुर्धर आहे, मला प्रत्येक अस्त्र अवगत आहे, मी महायोद्धा आहे. मात्र हा अहंकार माझा भ्रम होता. हेच सत्य आहे की मी कसा कृतास्त्रहीन आहे, मी कसा सामर्थहीन आहे, माझ्या मस्तिष्कातून अस्त्रांच्या मंत्राच्या स्मृती नष्ट होऊ लागल्या आहेत, जणू मस्तकावर (माझ्या) प्रत्येक मासंपेशीचा विस्फोट होत आहे! मी इतका बलिष्ठ आहे, मात्र तरीही त्याक्षणी माझे दोन्ही हात थरथरत होते, ते तर गांडीवही पेलू शकत नव्हते." अर्जुनाच्या क्षीण शब्दांत पश्चाताप व प्रगाढ लज्जाही होती, "असो आपल्या पत्नीचे- कृष्णाचे रक्षण

सभेत करता आले नाही, तो आपल्या सखाच्या कृष्णाच्या पत्नी- उपस्त्रियांचे कसं रक्षण करणार? माझ्या नेत्रांदेखत त्या दुष्ट भिल्लांनी कृष्णाच्या काही स्त्रियांचे आणि द्वारकाच्या संपत्तीचे हरण केले आणि मी काहीच करू शकलो नाही. कारण ज्याने विवस्वत सूर्याद्वारे वैवस्वत मनुला प्राप्त केलेले झालेले दुर्मिळ ज्ञान मला प्रदान केले, तोच माझा सखा त्यानेही त्याच्या निजधामी प्रयाण केले.

"आर्यपुत्र! आपण, असत्य म्हणताहात? कृष्णाचे गोलोक प्रस्थान असंभव आहे!" पांचालीचे मानसिक संतुलन ढळले होते, ती वारंवार अर्जुनाचा कंठहार ओढत विचारत होती.

"कृष्णच म्हणाला होता, आत्मा विभिन्न देहांची वस्त्रे धारण करतो आणि त्यांचा त्यागही करतो, त्याप्रमाणेच कृष्णाने देहत्याग केला होता, मात्र त्याक्षणी तो अत्यंत तणावात व दुःखात होता. कारण कृष्णासमोरच यादव

आपल्याच कुंटुबजनांवर प्रहार करत होते व कृष्ण निरुपाय होता. त्याने त्याक्षणीच देहत्याग केला, ज्याक्षणी मी त्याच्याजवळ गेलो होतो आणि त्याला विनंती केली होती, “मला सोडून जाऊ नको रे!” मात्र तोपर्यंत कृष्णाचे पार्थिव शरीर निष्प्राण झाले होते.”अर्जुनाने रथाच्या मंचकावरील वस्त्र उघडले, “हे पहा, कृष्ण -बलरामांची पार्थिव शरीरे!”

ते पाहून सुभद्रा कोसळली. तिला पांचालीने सावरले. कृष्णाच्या व बलरामांच्या मुखांवर प्रचंड ताण व चिंता होती. सहदेवाने पाहूनच जाणले की मनुष्याच्या भावी नैतिक अध:पतनकारणे व अधर्माकारणे या उभयंताची मुखमंडले चिंतित आहेत.”

सहदेवाने नेत्र मिटले. त्याला आभास झाला की सर्वदिखत धर्म व संस्कृतीचे वस्त्रहरण होईल, अपमान आणि विटंबना होईल, तरीही बहुतांश व्यक्ती आपल्याप्रमाणे, भीष्म, धृतराष्ट्र, कृप, द्रोणादि धर्मज्ञांप्रमाणे

मौन साधतील. विदुर, विकर्ण तसेच युयुत्सुप्रमाणे धर्माचा पक्ष धारण करणारे फारच अत्यल्प असतील.

"धर्माच्या जागृतीसाठी तुझी आवश्यकता आहे, कृष्णा! तूच म्हणाला होतास ना, ज्या-ज्यासमयी धर्म ग्लांत होईल, संस्कृतीचा अपमान होईल, त्या-त्यासमयी तू धर्म संस्कृतीचा पक्ष धारण करून दुर्जनांचा नाश करतोस. मला आभास होत आहे की द्वापार युगापेक्षा भावी युगामध्ये भयंकर घडेल, धर्म -संस्कृतीला तेच संकटकारण ठरेल. म्हणूनच तू पुन्हा पुन्हा देह धारण कर." सहदेवाने कृष्णाला प्रार्थना केली, तत्क्षणी कृष्णाचे पार्थिव अधर हलले अथवा सहदेवाच्या मस्तकात अमूर्त शब्द गुंजले, " धर्मजागृतीसाठी प्रत्येकाने स्वतःतील कृष्णाला जागृत केले पाहिजे, ज्याप्रमाणे पांचालीने द्युतसभेत स्वतःमधील कृष्णाला जागृत करून स्वतःच्या बुद्धीद्वारे परिस्थितीवर मात केली होती. मी तिचे लज्जा रक्षण केले होते. मी धर्म संस्कृतीला लज्जित होण्यापासून रक्षण केले होते,

सर्वांदेखत धर्म संस्कृतीच्या अंगावर नीतीतत्वे, करुणा, प्रेम, विश्वास व निष्ठेची वस्त्रे टाकून! याशिवाय त्या अपमानाच्या अतिउत्कट क्षणीही पांचालीचे तेज प्रखर होते, म्हणजेच धर्माचे तेज जांज्वल्य होते. धर्माचा पाया ‘सत्य' हे होते. म्हणूनच धर्माने धर्महनन करणाऱ्यांना मात दिली, मात्र तुम्हां पांडवासारख्या कर्मधर्मकृपणांकारणे त्या धर्माला न्याय प्राप्त करण्यासाठी तेरा वर्षे प्रतीक्षा करावी लागली. यदि तुमच्याप्रमाणे धर्मकृपण व कर्मत्यागी भावी मनुष्य असतील, तर धर्म व संस्कृतीचे कसे रक्षण होईल?”

कृष्णाचे शब्द सत्यच होते. सहदेवाने लज्जने मान खाली घातली. धर्मज्ञ अथवा प्रतापी लोकांचे याशिवाय राजकर्त्यांचे धर्मपालनच दुर्बल असेल तर धर्माचे रक्षण कसे होणार?

“भ्रातेहो! ही मृगचर्मे धारण करावी आणि आपल्यासह राजवस्त्रे-शस्त्रे धारण करावी!” युधिष्ठिराने कृष्णाजिने धारण केली आणि अन्य पांडुपुत्रांनाही मृगचर्मे दिली.

अन्य पांडुपुत्रांनी उत्तरीयांचा त्याग केला व शरीरावर मृगचर्मे लपेटून घेतली. त्यांनी अलंकाराचा-आभूषणांचा त्यागही केला होता.

तत्क्षणी पांचाली पांडुपुत्रांच्या कक्षात प्रवेशली. तिचा वेष पाहून सर्व पांडव चकित झाले, परंतु त्यानंतर त्यांच्या लक्षात आले की त्यांची सहधर्मिनी -अर्धांगिनी त्यांचाच पथाचे अनुसरण करणार आहे.....

त्यांनी पाहिले,पांचालीने कषाय राजअंकुश धारण केलेले होते आणि स्कंधावर कृष्णाजिन लपटलेले होते. ती अनलंकृत होती. याशिवाय तिने पुष्प, रत्न, सुगंधी द्रव्ये, चंदन चूर्ण आदि शृंगार उतरवलेला होता, अर्थात तिने पुनश्च सचैल स्नान केलेले होते. त्याकारणे शृंगारहीन व रत्नहीन असलेले तिचे रुप अग्निच्या विलक्षण तपोतेजाने उजळलेले होते. म्हणजे मूळचे तेज अधिक प्रकटरीतीने झळाळत होते.

"कल्याणी! तू ही कषाय वस्त्रे का धारण केलीस? तसेच कृष्णाजिनाचे काय औचित्य? याशिवाय तू अनलंकृत का आहेस आणि शृंगारहीनही?" युधिष्ठिराने प्रश्न केला. यावर द्रौपदीने उत्तरही दिले, "आर्यपुत्र, मी संपूर्णतः अनलंकृत नव्हे. मी सौभाग्यचिन्हे धारण केली आहेत. ही स्वर्णकंकणे, विवाहमुद्रिका, चूडामणी, कंठहार व दिव्य वस्त्रही धारण केलेले आहे. मीही आपल्यासह महाप्रस्थान करणार आहे." यावर पांडवांनी विशेष काही प्रतिक्रिया दिली नाही. भीमसेनाने म्हटले, "तत्पूर्वी आपण हस्तिनापूराचा नरेश व

मी महाराणी-परीक्षित-मद्रावती आणि इंद्रप्रस्थाचा नरेश - राज्ञी-वृषकेतु त्याची पत्नी -कांचनमतीचा राजतिलक केला पाहिजे.”

पांडवांनी विशेष प्रतिक्रिया न देण्यामागे एकच कारण होते की त्यांनाही त्यांची सहचारिणी त्यांच्यासह महाप्रस्थान करेलच, ती त्यांच्या अंतिम यात्रेत सहभागी होईलच, अशी खात्री होती, किंबहुना विश्वास होता.

“आर्यपुत्र! अर्थातच, आपण हे अंतिम कर्तव्य केलेच पाहिजे. याखेरीज अजून एक कर्तव्य आहे, जे मला महत्त्वपूर्ण वाटते आणि अतिआवश्यकही.” पांचालीने गूढार्थाने म्हटले. तिच्या शब्दांकारणे पांडवांची तंद्री भंगली. नकुलाने विचारले, “अजून कुठले कर्तव्य शेष राहिले आहे, नीलांगिनी? याशिवाय याहून कोणते कार्य अतिआवश्यक वाटते आहे?”

“परीक्षिताला गृहस्थाश्रमातील संन्यासाचे महत्त्व कथन करण्याचे व सर्व प्रकारच्या विकारांपासून विशेषतः क्रोधापासून तसेच अहंकारापासून दूर राहण्याचे सूचित करण्याचे हे महत्त्वाचे कार्य आहे!” कृष्णेचा गंभीर स्वर.

तिच्या या शब्दांवर पांडव गंभीर झाले. तत्क्षणी सेवकाने येऊन म्हटले, “महाराज, महर्षी वैशंपायनांचे आगमन झाले आहे. त्याकारणे आपण त्वरित सभास्थानी यावे, अशीच त्यांची इच्छा व आज्ञा आहे.” यावर अर्जुनाने दु:खित स्वरात म्हटले, “उचित म्हटलेस तू! “आपण त्वरित सभास्थानी आणि वनात प्रस्थान केले पाहिजे. कारण मोहाचे, नात्यांचे बंध हळूहळू तोडायला पाहिजेत.” अर्जुनाच्या या शब्दांना पांचालीने विरोध केला, “मात्र पांडव आणि पांचालीचा भावबंध अत्यंत दृढ व अखंडित आहे, आणि .........” पांचालीचे वाक्य तोडत युधिष्ठिराने म्हटले, “आपण सभेत प्रस्थान केले पाहिजे.”

पांचालीला कळेना, युधिष्ठिराने तिचे वाक्य का खंडित केले ते.

तिने पांडुपुत्रासह राजसभेत प्रस्थान केले. त्यानंतर पांचालीने परीक्षित व मद्रावतीचे राजतिलक करुन त्यांचे पंचारतीने स्वागत केले. याखेरीज युधिष्ठिराने परीक्षिताला स्वर्णाचा किरीट प्रदान करुन त्यांच्या हातात तलवार आणि राजदंड सोपावला. तत्क्षणी कृष्णेने मद्रावतीच्या हातात राजदंड तसेच कलश प्रदान केला. त्यानंतर परीक्षित-मद्रावतीचा राज्याभिषेक झाला. त्यांचा राज्याभिषेक झाल्यानंतर पांडवांनी ज्याक्षणी सभेतून प्रस्थान केले, त्याक्षणी परीक्षिताने पांडवांच्या मागे धावत जाऊन अर्जुनाला आलिंगन दिले. त्याला किंबहुना याचे विस्मरण घडले की तो आता सम्राट आहे, बालक नव्हे.

त्याने म्हटले, “मी कुठल्याही परिस्थितीत आपणां सर्वांस वानप्रस्थ करु देणार नाही. हे ऐकून पांडवांच्या मनात

पुनश्च मोह निर्माण झाला. अशा विकट समयी द्रौपदीने परीक्षिताला पांडवांपासून दूर करत म्हटले, “परीक्षिता! आम्ही तुझ्यापासून दूर गमन करतो आहे, याचा अर्थ असा नव्हे कि आमचे संस्कार तुझ्यापासून दूर होणार आहेत. आमचे मार्गदर्शन व आशिर्वाद सदैव तुझ्यासह आहेतच. हे लक्षात ठेव की क्रोध व अहंकार या विकारांपासून सदैव तू दूर राहावेस. त्यातच तुझे कल्याण सामावलेले आहे!“

“पितामही, युवराज जनमेजयही तुझ्याशिवाय राहू शकणार नाही. निदान त्या बालकाकडे तरी पाहा.” परीक्षिताने जनमेजयाला द्रौपदी समोर आणले, तत्क्षणी जनमेजयाने विनंती केली, “कृपया आम्हांला सोडून वानप्रस्थ करु नकोस, प्रपितामही!” यावर पांचालीने जनमेजयाला म्हटले, “जनमेजया, मला प्रपितामहांसह (तुझ्या) प्रस्थान करावेच लागेल, त्याशिवाय पर्याय नाही. कारण आमचा सखा आमची शक्ती, सर्वस्व, सामर्थ्य, तेज तसेच संवेदना होता. त्याने महाप्रस्थान करता- करता

आमची शक्ती, सर्वस्व, सामर्थ्य, तेज तसेच संवेदना शोषून घेतल्या आहेत. त्याकारणे आम्ही सर्व शून्य झालो आहेत. आता महाशून्याकडे प्रस्थान करण्याचा समय आला आहे. चलावे, आर्य!"

पांडुपुत्र क्षणभरही हस्तिनापुरात थांबले नाहीत. त्यांनी क्षणार्धात आपल्या पत्नीसह इंद्रप्रस्थात प्रयाण केले. तेथील राजमहालात त्यांनी वृषकेतुचा व कांचनमतीचा राजतिलक केला. मात्र वांशिक द्वेष आणि विक्षोभाकारणे वृषकेतुने त्यांना रोखले नाही. मात्र तेथे उपस्थित असलेल्या देविका, विजया, सुभद्रा, करेणुमती, पौरवी तसेच भानुमती अशा पांडवस्त्रिया पांडुपुत्रांना रोखण्याचा प्रयत्न करु लागल्या. परंतु त्यांचे प्रयास विफल ठरले.

"आर्य, आपण आमचा त्याग करुन नका. कृपया आम्हांलाही महाप्रस्थान करु द्यावे."

*आम्हीही आपल्यासह वनांतील कुट्यांमध्ये निवास करु.”

“आपले चरणतल भेगाळले, तरी आम्ही आपल्यासह अंतिम प्रवास करु.”

“आम्ही स्वर्ग इच्छित नाही, फक्त आपल्या सहवासाची इच्छा आहे आमची!”

“आपण सर्वांनी येथून प्रस्थान केले, तर!” सुभद्रेने चिता प्रज्वलित केली, “भ्राताश्री युधिष्ठिर, पार्थराज, मी अग्निदाह करुन घेईन.” हे पाहून द्रौपदी नि:शब्द व मुखस्तंभच झाली.

“नाही, सुभद्रे!” नकुलाने म्हटले, “असा कुविचारही करु नकोस.”

“भद्रे! कदाचित तुझा मृत्यू नियंत्याने असाच लिहिला असेल.” सहदेवाने शांतपणे म्हटले.

“तू द्रौपदीप्रमाणे अखंड सौभाग्यवती होऊन मृत्यूस प्राप्त होणार असशील. चला, भ्रातेहो! आपल्यात इतकेही सामर्थ्य उरले नाही, की सुभद्रेचा निश्चयभंग करावा.”

“असे कसे शक्य आहे?” अर्जुनाने क्षीण स्वरात म्हटले. त्याने पर्जन्यास्त्र मंत्र स्मरण्यास प्रारंभ केला. मात्र त्याला काहीच स्मरेना.

पांचाली व पांडवांचे काहीच न ऐकता सुभद्रेने अग्निदाह करण्यास प्रारंभ केला. तत्क्षणी पांडवांनी सेवकांना जल आणण्याचा आदेश दिला. परंतु व्यर्थ! चिता विझल्यानंतर सुभद्रेचा निष्प्राण देह प्राप्त झाला. अर्जुनाने तिचे मस्तक मांडीवर घेतले आणि शोक व पश्चात्ताप करण्यास प्रारंभ केला. त्यातच त्याचे वस्त्र जळून गेले. नकुलाने त्याला सावरले.

नियतीने अजून एक धागा छाटला होता! आता पांडव-पांचालीला मोहापासून विभक्त- अलिप्त होऊन प्रयाण करण्यावाचून विकल्प नव्हता.

“प्रत्येक पांडवाच्या प्रियतमाहो! पांडुकुलाच्या राजस्त्रियाहो! आपण सर्वजणी आमच्यासह महाप्रस्थान करु शकत नाही. कारण महाप्रस्थात अविश्रांतपणे चालावे लागते, याखेरीज विश्रांतीसाठी पर्णकुटी व मंदिरात थांबावे लागेल,भोजनाकरिता पक्वान्ने प्राप्त होणार नाहीत, फले आणि त्यानंतर पर्णांचे भक्षण करावे लागेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जंगली श्वापदाने तुमच्यापैकी कुणावर आक्रमण केले तर, आम्ही आपणांस संरक्षण पूर्णतः देऊ शकणार नाही. कारण आम्ही सर्वजण सामर्थ्य हीन व शक्तीहीन झालो आहोत. याखेरीज हिमालयासम पर्वतावर अथवा कोणत्याही पर्वतावर आरोहण करणे, विशेषतः

विमानाशिवाय हे सहजसुलभ नसते. तेथे असलेला वायूचा अभाव आणि प्रकाशाचे आधिक्य, निसरडा मार्ग, वारंवार कोसळणारे हिमपुंज, वादळी वारे, श्वास घेताना पीडा होणे, अशा कठीण परिस्थितीशी संघर्ष करावा लागतो.” युधिष्ठिराने सूचित केले.

“तेथील घळी, हिमप्रपात, शिखरे, कठोर पाषाणखंड, कंटकी मार्ग पार करणे जवळजवळ अशक्यच असते. यदि तुमच्यापैकी कोणाचा तेथे देहांत झाला अथवा कोणी तेथेच कोसळले, तरी आम्ही वळूनही पाहू शकत नाही, कारण आम्ही जर वळलो, तर आमचा मोह पुनश्च बळावेल.” सहदेवाने कठोरपणे म्हटले.

“पांचाली, हे नियम तुला मान्य आहे का?” भीमसेनाने प्रश्न केला, यावर पांचालीने मान डोलावली, “मला मान्य आहे. कारण मी ज्येष्ठ पांडवस्त्री म्हणजे पांडवांची पट्टराणी

आहे. त्याकरिता कितीही कठीण व असुलभ असली तरी, मी पांडवासह अंतिम यात्रा करणारच.”

मात्र हे सर्व ऐकून भय व आंशकेने अन्य पांडव स्त्रियांनी नकार दिला. त्याकारणे पांडुपुत्र पांचालीसह सर्वप्रथम रथाद्वारे इंद्रप्रस्थ व हस्तिनापुरातून बाहेर पडले. त्यांनी रथाचा त्याग केला. मंदार -गंधमादन पर्वताजवळ असताना पादत्राणांचा त्याग, केदारनाथ क्षेत्री फलांचा त्याग, सरस्वती नदीच्या पात्राजवळ शस्त्रांचा त्याग असे पांडवांनी निश्चित केले होते. मात्र अर्जुनाच्या मनात अजूनही गांडीव धनुष्याविषयी मोह होता.

पांडवांनी सर्वप्रथम महर्षी व्यास आणि शौनकांच्या आश्रमात काही दिनापर्यंत निवास केला. त्यानंतर त्यांनी मंदार -गंधमादन पर्वताकडे प्रस्थान केले. त्यासमयी त्यांनी परिचित तीर्थांचे दर्शन घेतले, कंडुमुनींचा आश्रम, नैमिष्यारण्य, बद्रिकाश्रम, मधुविनी आदि तीर्थांचे दर्शन

घेतले. पवित्र कुंडामध्ये स्नानेही केली. त्याकारणे पांडुपुत्रांना व पांचालीला वनवासाचे दिन स्मरले. मात्र त्या दिनांमध्ये आणि या दिनांमध्ये भेद होता. त्या दिनांमध्ये कष्ट, पीडा, तसेच कठीण प्राकृतिक परिस्थितीने कुरुसंहाराच्या प्रेरणेची जाणीव दिली होती, मात्र या दिनांमधल्या कष्ट, पीडा आणि कठीण नैसर्गिक परिस्थितीने हा देह व जीवन नाशवंत आहे, अशा विरक्ती ची जाणीव करून दिली.

त्यानंतर पांचाली व पांडुपुत्रांनी पादत्राणांचा त्याग केला. त्यांच्यासह काही मार्गदर्शक ऋषि चालत होते.

मात्र पांडव व पांचालीने पादत्राणांचा त्याग करताच त्या सर्वांच्या चरणांना कंटक, पाषाणखंड, मार्गातील कंटकी वस्तू रुतू लागल्या होत्या. मात्र त्या सर्वांना त्या जखमांची पर्वा होत नव्हती. कारण पांडुपुत्रांना स्वर्गारोहण करण्याची महत्वाकांक्षा होती, विशेषतः युधिष्ठिराला प्रथमत:च सदेह स्वर्गारोहण इच्छा होती. किंतु पांचालीला अशा प्रकारची

कुठलीही इच्छा राहिली नव्हती. कारण तिला आपल्या सख्याशिवाय जगत निरस वाटू लागले होते. तिला फक्त इतकेच वाटत होते की आपण आपल्या मूळ स्थानी म्हणजेच अग्निलोकी व इंद्रलोकी, आपल्या मूळ स्वरुपात म्हणजेच शची, श्री, तसेच कृत्येच्या स्वरुपास प्राप्त झाले पाहिजे.

अर्जुनालाही अशा प्रकारची (काहीशी) इच्छा होती की आपण सदेह गोलोकात अथवा वैकुंठात गमन करावे, याच पार्थिव शरीरानेच अर्थातच नराच्या नरजन्मीच्या कायेने (मर्त्य) नारायणाच्या दिव्य देहाला आलिंगन द्यावे, त्याकारणे नर-नारायणाचे युगुल पूर्णत्वाने परिपूर्ण, संपन्न आणि अखंडित होईल.(राहिल) आता केदारनाथ येईल. तेथेच नर-नारायणांच्या म्हणजे आम्हां दोघांच्या सख्यतेच्या स्मृतिचिन्हांचे म्हणजेच आश्रमाचे (त्यांच्या) दर्शन घडेल, अर्जुनाने विचार केला.

पांडुपुत्रांनी त्यानंतर केदारनाथाचे दर्शन घेतले आणि फलाहार त्यागण्याच्या निश्चय केला. त्यांना आपल्या ज्येष्ठ पत्नीसह पर्णांचे (पान) भक्षण प्रारंभित केले.

त्यानंतर पांडुपुत्रांनी सरस्वती नदीच्या पात्राजवळ आपल्या तलवारी, धनुष्य, तूणीर, प्रास (भाला) आदि शस्त्रास्त्रे त्यागली. पांचालीने आपली प्रिय अशी तलवार तेथेच त्यागली. आता शस्त्र नसूनही हिंस्त्र श्वापदांचे भय वाटत नव्हते. कारण ईश्वर व ईश्वराचे नाममंत्र समीप असताना अर्थात त्याचे आशिष असताना, मंदिरात ईश्वर सेवा करत असताना त्यांना हिंस्त्र श्वापदांपासून काहीच इजा होणार नाही, अशी खात्री वाटली होती. त्याकारणे ते निश्चित होऊन हिमालयाच्या पर्वतशिखरापाशी पोहोचण्यासाठी चालू लागले. मात्र अर्जुनाने गांडीव धनुष्य आणि अग्निदत्त अक्षय तूणीर त्यागला नव्हता. म्हणून पांडव -द्रौपदी हिमालयाच्या पायथ्याशी पोहोचता, तत्क्षणी अग्निदेव तेथेच प्रगटला आणि त्याने अर्जुनाकडे गांडीव व तूणीर

मागितले. अर्जुनाने ते प्रदान केलेही. त्याक्षणीच ऋषि व ऋषिकुमारांनी त्यांना निरोप दिला, मात्र त्यांनी निरोप देता-देता पांडुपुत्रांना हिमालयाची शिखरे, घळी, हिमप्रपात अशा दुष्कर मार्गातून चालताना येणाऱ्या विपदा, वादळे अथवा हिमवर्षेविषयी पुनश्च सूचित केले आणि स्वतःची पर्यायाने स्वतःच्या देहाची काळजी घेण्यासाठी कथित केले, जेणेकरून पांडवांना आपल्या ज्येष्ठ पत्नीसह सदेह स्वर्गारोहण व हिमाचलावर प्रस्थान करता येईल. पांडुपुत्रांनी पांचालीसह ऋषिगणांचे आशिष घेऊन निरोप दिला व त्यानंतर त्या सर्वांनी आपापल्या उत्तरीयाचा त्याग केला. ते पाहून पांचालीनेही आपले उत्तरीय त्यागले व त्याजागी कृष्णाचा पितांबर लपेटून घेतला.

हिमालयाच्या स्वर्णिम तेजाने प्रकाशित व पवित्र झालेल्या शिखरावर पांडवांनी पांचालीसह आरोहण केले होते. एव्हाना ते सर्वजण हिमालयाच्या उच्चतम शिखरावर आरोहण करत होते. त्याकारणे पांचालीच्या श्वसनवेगात

अधिकच व्यवधान येऊ लागले होते. तिच्या शरीरावरील वस्त्रे पितांबर वगळता जीर्ण झालेली होती, अन्नाशिवाय व जलाशिवाय तिचे शरीर कृश झाले होते. त्याकारणे तिला वारंवार भोवळ येत होती. अधूनमधून तिच्या नेत्रांवर प्रदीप्त प्रकाश अथवा अंधकार दिसत होता.. त्याकारणे ती पांडवांचा वेग पकडू शकत नव्हती. काही क्षणांनी त्या उच्चतम शिखरावर अकस्मात हिमाच्या भूमीचा एक उपखंड कोसळला. पांचालीने स्वतःचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याकारणे ती भूमीवर कोसळली. तिला कळले की स्वतःचे शरीराचे रक्षण आता व्यर्थ आहे. तिघी कोमल पाऊले रक्तरंजित झाली होती, कंटक व पाषाणाखंडाकारणे, तसेच तिच्या बाहूमध्ये कंटकी वनस्पतीकारणे ओरखडे उमटले होते, मात्र हिमालयाच्या पवित्र अशा उच्चतम शिखरावर असल्याकारणे तिच्या शरीराला विशेष अशा संवेदना नव्हत्या. किंतु तिच्या मनाला भावना व चेतना तर होत्या. मात्र पांडवांनी वळूनही

पाहिले नाही. म्हणूनच तिने आपल्या पतींना हाकारण्याचा प्रयास केला, मात्र तिचे शब्द हिमपुंजाप्रमाणे तिच्या कंठात द्रविभूत झाले.

तिला वाटले, ज्यांच्यासह तिने दांपत्यजीवन तसेच पत्नी धर्माचे पालन केले होते, ज्यांच्यासाठी तिने वनवास काळात तसेच महाप्रस्थानकालात विपिनामध्ये दुःख,पीडा व श्रम झेलले, ज्यांच्यासाठी तिने अगणित अपमान सहन केले, ज्यांच्याप्रति तिने अंतिम क्षणापर्यंत पातिवर्त्याचे पालन केले, ते -तिचे पंचपतीदेव- त्यांनी वळूनही पाहिले नाही. त्यांना स्वर्गाची इतकी महत्वाकांक्षा आहे की मृत्यूच्या दारात असलेल्या- तिचा त्याग करून स्वर्गाच्या मार्गाकडे अग्रेसर झाले आहेत.

ते पाहून द्रौपदीने मनोमन आक्रोश केला, “आर्यपुत्रहो! तुम्हां सर्व पांडवांच्या हदयात स्वर्गाची इतकी महत्त्वकांक्षा आहे की आपण सर्व पांडव मला अर्थात आपल्या

सहचारिणीला, सहगमिनीला, आपल्या ज्येष्ठ पत्नीकडे वळून न पाहता हिमालयाच्या सर्वोच्च शिखराकडे अग्रेसर झाला आहात. असे काय घडले की आपण या हिममार्गावर माझा त्याग केलात? का मला उठवून सहाय्यता देण्याचा प्रयास नव्हे, विचार आपल्या मनात आला नाही?" द्रौपदी ग्लांत झाली होती, तिचा देह सुषुप्ती अवस्थेत असला, तरी तिचे मन व आत्मा पूर्णतः त्या अवस्थेत प्रवेशले नव्हते अजूनही. तिचा मौन व अवाचिक आक्रोश सुहृदय भीमसेनानेच ऐकला होता आणि तो क्षणार्धात मागे वळला. त्याने पाहिले, द्रौपदी हिमाच्या उपखंडांच्या मार्गावर कोसळलेली आहे. मात्र अजूनही ती जिवित होती म्हणूनच तिच्या हाताची अस्फुट हालचाल होत होती. त्याला वाटले, पांचाली यदि जिवित आहे, तर तिला उठण्याकरिता सहाय्यता आपण केली पाहिजे, असा विचार करून तो पांचालीकडे वळला. तत्क्षणी युधिष्ठिराच्या स्वराकारणे, "थांब भीमा!" पाचालीची तंद्री भंगली. त्याचवेळी भीमाने

पांचालीसमोर तिला सहाय्यता करण्यासाठी आपला बलवान हात धरला, “भ्राताश्री! कृष्णा मार्गातच पडली आहे म्हणून तिची सहाय्यता मला करु द्या. कृष्णे, आपला हस्त माझ्यापुढे वर, जेणेकरून मी तुला सहाय्यता करु शकेन.” पांचालीने आपला हात उचलण्याचा प्रयत्न केला मात्र तो प्रयत्न विफल ठरला कारण तिचे उभय हात जणू निश्चेष्ट पडले होते त्याक्षणी युधिष्ठिराचे शब्द त्या दोघांच्या व अन्य पांडुपुत्रांच्या कानी पडले,” द्रौपदीला सहाय्यता करु नकोस. ती पांडवाकरिता प्रिया, दर्शनीया, पंडिता व पतिव्रता असली तरी ही शुभा, कल्याणी आपल्या पातका कारणे कोसळली आहे. ती सर्व स्त्रियांमध्ये श्रेष्ठ असूनही तिच्या आचरणात दोष होता म्हणून तिचे पतन झाले आहे.,” हे सर्व ऐकून पांचालीला क्रोध आला. युधिष्ठिराच्या मनातील अढी (पांचाली विषयी) या उभय वाक्यातून कळत होती. त्याकारणे पांचालीला खेदही वाटला. तिला वाटले, आपण असा कोणता प्रमाद केला की आपल्या पतीला आपल्या

कर्मामध्ये पातक दिसावे? धर्मराज कदाचित अर्जुनप्रेमाविषयी बोलत असतील का?

युधिष्ठिराचे ते शब्द ऐकून पांचालीचे हृदय दुखावले गेले व पर्यायाने भीमाचेही. युधिष्ठिराला उत्तर देत भीमाने म्हटले, "दोष आणि पातक........? द्रौपदी सती, पतिव्रता प्रियदर्शनी, विदुषी आणि सर्वयोषिद्वारा आहे. तिने आपल्या सर्वांचे सदैव नि:पक्षपाती व समानतेने आचरण केले आहे. तिने कधीच प्रतारणा वा पक्षपात केलेला नाही. तिने कुठल्याही अवस्थेत व परिस्थितीतर आपल्या सर्वांसह दु:सह असलेले जीवन जगले आहे. ती पातकी कशी असू शकते? तिच्या आचरणात दोष कसा असू शकतो? तिने आपल्याकरिता पीडा, अवमान झेलले आहेत. भ्रात्या हे तुला स्मरणात नव्हे!"

" कल्याणीने माता कुंतीचे आज्ञेनुसार आपणा चौघां पाडवांचा पती रूपात स्वीकार केला. तरी तिने अर्जुनाच्या

कंठावर वरमाला व जयमाला धारण केली असली, तरीही मात्र तिने आपणास चौघां पांडवाचा केलेला स्वीकार केवळ दंभ होता, प्रतारणा होती.” युधिष्ठिराचे शब्द अत्यंत पांचालीवर गंभीर आरोप करणारे होते. त्याचे शब्द ऐकून पांचालीला कळले, की युधिष्ठिरच्या रोख पांचालीच्या अर्जुन प्रेमाविषयी होता. मात्र त्याला द्रौपदीच्या पतीनिष्ठा अथवा पतीचा स्वीकार याबाबत शंका घेण्याचा इशिका मात्र ही अधिकार नव्हता.

अर्जुन व सहदेवालाही युधिष्ठिलाच्या शब्दाचा अर्थ कळला होता. कारण अर्जुनालाही जाणीव होती की पांचाली त्याच्यावर अत्याधिक व सर्वाधिक प्रेम करते आहे आणि त्रिकालदर्शी सहदेवाला युधिष्ठिर काय बोलणार आहे, त्याच्या शब्दाचा अर्थ काय आहे या सर्वांची कल्पना होती.

भीम व नकुलांनी आश्चर्याने विचारले, “काय? पांचालीने मातृआज्ञेचे पालन केले, वंचना नव्हे.”

“अन्य पांडुपुत्रहो! माझे शब्द सत्यच आहे. आपल्या ज्येष्ठ पत्नीने म्हणजेच कल्याणीने निष्पक्षतेने पत्नी धर्माचे पालन केले नाही. तिने आपल्यातील चारी पांडवांशी प्रतापणा केली आहे. ती आम्हां पाचांपैकी फक्त एकाला सर्वाधिक प्रेम देत राहिली, भ्रातेहो!” हे ऐकून नकुल शंकित झाला. द्रौपदी त्याच्यावरच सर्वाधिक प्रेम करत असणार याची विशेष शक्यता व कारण दिसत नव्हते. भीमाच्या मुखावर प्रसन्न असे मंद स्मित उमटले. त्याला खात्री होती की ती त्याच्यावरच अत्याधिक प्रेम करत असणार, कारण त्याने तिची प्रत्येक इच्छा, महत्त्वकांक्षा, अपेक्षा व आकांक्षा पूर्ण केली होती.

“तो कोण होता?” भीमसेनाने म्हटले. यावर युधिष्ठिराने उत्तर दिले, “अर्जुन! पांचालीने अर्जुनावरच सर्वाधिक प्रेम

केले होते. या पक्षपाताकारणे तिचे पतन झाले आहे.” हे ऐकून नकुल निराश झालाच, मात्र भीमसेनाचा अपेक्षाभंग झाला, त्याच्या मनात दुःख, क्रोध, खेद, विषण्णता, उद्वेग व पीडा अशा संमिश्र भावना दाटल्या होत्या. त्याकारणेच तिला त्याने सहाय्य केले नाही, वळून तो स्वर्गमार्गाकडे चालू लागला. कारण तो पांचालीवर रुष्ट झाला होता. हे पाहून द्रौपदीला क्रोध आला व क्रोध हीच तिची शक्ती होती. त्याकारणे जणू अग्निशलाका तिच्या अंगात स्फुरली. ती धडपडत व थरथरत उठली.

तिने आपल्या शरीराला हिमप्रवाहात, हिमप्रपातातही स्थिर केले. तिच्या श्वसनाचा वेग वाढला होता, कारण ती हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर होती. मात्र तिने आपला श्वसनवेग नियंत्रित केला व उच्च स्वरात पांडुपुत्रांना प्रश्न केला, “धर्मराज! मला एक प्रश्नाचे उत्तर द्या की स्वयं वराचा पण पांडुकुमार अर्जुनांनी जिंकला होता की नव्हता? मी त्यांच्या कंठात वरमाला व जयमाला घातली होती की

नव्हती? त्याक्षणी मी त्यांची अर्धांगिनी झाली होती की नाही? त्याक्षणी फक्त त्यांचा माझ्यावर व माझा त्यांच्यावर एकाधिकार होता की ना? आर्यपुत्र, तर आपण अशा असत्याला अनुमोदन का दिलेत की, आम्ही भिक्षा अथवा दुर्लभ वस्तू आणली आहे, असे का? अशा असत्य वचनाचा प्रयोग का केलात आपण? मला एक प्रश्नाचे उत्तर द्या, मी भिक्षा आहे, का? मी दुर्लभ वस्तू आहे का? मी तर राजकुमार अर्जुनाद्वारे जिंकली गेलेली सन्मता स्वयंवरा नारी होती ना! तरीही आपण आर्यपुत्र अर्जुन! आपण माझ्या मनाचा विचार न करता साहज्याने म्हणालात, की ही पांचाल राजकुमारी कृष्णा सर्वप्रथम युधिष्ठिराच्या तद्नंतर भीमाच्या, त्यानंतर माझ्या व नकुल सहदेवाच्या कंठात वरमाला घालेल. मात्र मी तुमच्या शब्दांचा अनादर नाही केला. माझ्याकारणे पांडुपुत्रांमध्ये दुही माजू नये व त्यांचा एकमेकांशी लढून नाश होऊ नये म्हणून मी हा विवाह केला. परंतु तुम्हाला ज्ञात नसेल, त्याक्षणी गुप्तचरांकरवे क्षत्रिय तथा

कुरुपुरुषांनी या विवाहावर केलेला उपहास कळल्यावर काय मनस्थिती झाली असेल, माझी.....”

पांडुपुत्र क्षणार्धात थांबले.

यावर अर्जुनाने दुःखातिशयाने उसासा टाकत म्हटले, “कृष्णे, कृपया असे म्हणू नकोस. तू स्वतःला अशी पीडा करुन घेत आहेस, कृष्णे, कृपया शांत...... “ अर्जुन अडखळला. त्याला जणू वाटत होते असोशीने, कृष्णेने एकदा आपले ते शल्य बाहेर काढून टाकावे, मृत्यूसमयी इतका भयंकर बाण उरात असता कामा नये, म्हणून तो सूचित करु शकला नाही. यावर द्रौपदीने थरथरत्या स्वरात म्हटले, “आर्यपुत्र, अर्जुन, मला रोखू नका, मला बोलू द्या. माझ्या मौनाकारणे माझ्या मृत्यूसमयी मी शांतपणे स्वर्गलोकी प्रस्थान करु शकत नाही!” तिने धर्मराजाला उद्देशून म्हटले, “धर्मराज आपण इतक्या सहजतेने म्हटले की मी पक्षपातीपणाने अर्जुनांनाच प्रेम दिले. परंतु हे

बोलण्यापूर्वी आपण एकदाही विचार केला नाही मी त्याक्षणी नववधू होते. माझ्या नेत्रांत अन्य वधूप्रमाणे उत्तम गृहस्थी करण्याचे स्वप्न होती, त्याक्षणी माझा पंचकपरिणयाचा आदेश माझ्या कर्णपटलावर आदळला. मात्र ज्याक्षणी मी आपले शब्द ऐकले, ‘‘पांडवांत सदैव एकी व्हावी व कौरवांचा विनाश करता यावा म्हणून ही शुभा द्रौपदी पंचपतीचे वरण करेल.’’ त्याक्षणी मी आपले भाग्य स्विकारले. कारण मी पांडुकुलामध्ये सौभाग्यदायिनी कुलवधू होऊन प्रवेश केला होता, म्हणून माझ्यामुळे पांडवांमध्ये दुही माजू नये, मात्र असे म्हणून आपण माझ्यावर अन्याय करताहेत की मी पंचपतीवरण केले होते, ते दंभ होते. आर्यपुत्र.....’’तिने पुनश्च श्वास घेतला. काही वेळाने म्हटले, ‘‘मी कोणत्याही प्रकारचा उपालंभ न देता आपणां सर्वांचा स्विकार केला, तेही हदयपूर्वक! मी आपली बुध्दीमत्ता, कौशल्य, साहचर्य, प्रेम आणि सेवेला पणाला लावून आपला पत्नी धर्म पूर्णतः पालन केला आहे. जर

यातही काही त्रुटी राहिली असेल तर हदयाच्या अतीव कलाची असेल. मी हे सत्य मान्य करते की माझे हदय सदैव अर्जुनाप्रति झुकत राहिले आहे. परंतु त्याक्षणी माझा मनात विचार यायचे की मी माझ्या अन्य चारी पतींशी प्रतारणा तर करत नाही ना? परंतु यात माझा काय दोष होता? माझ्या हृदयाच्या अतीव कल स्वाभाविक होता. तरीही मी स्वतःला अपराधीच समजत होते.” तिने हात जोडले.

“परंतु आर्यपुत्र, आपण माझा पक्ष ऐकलात, कृपया आपण मला समजून घ्यावे.” तिचे शब्द ऐकून पांडव स्तंभित झाले होते, परंतु त्या सर्वांची स्तंभितता दुःखाच्या निस्तब्धतेत परिवर्तित होणार होती.

आता माझ्या उरातील हा बाण आता निघाला आहे, आता मला इहलोकातून स्वलोकात अर्थातच स्वर्गलोकामध्ये प्रस्थान केले पाहिजे, असा विचार करुन कृष्णेने नेत्र मिटून अग्निदेव, इंद्रदेव, स्वाहा, लक्ष्मीदेवी,

महादेव व भद्रकालीचे स्मरण केले आणि तिच्या पायांच्या अंगुष्ठातून अग्निशलाका उत्पन्न झाली व तिच्या शरीराचे अग्निस्फुलिंगांमध्ये परिवर्तित झाले व ती स्फुलिंगे उच्च दिशेत प्रस्थान करती झाली.

हे सर्व पाहणारे पांडवही अजूनही स्तब्ध होते............

# दशम बंध

द्रौपदीने नेत्र उघडले, तत्क्षणी ती स्वर्गात होती. तिचा मानवी देह अग्निने पुनश्च स्वतःकडे घेतला होता. त्याकारणे तिचे दिव्य शरीर स्वर्गात प्रवेशले होते. तिने समोर पाहिले, वायुदेवताची पत्नी भारती, धर्मदेवाच्या स्त्रिया- श्यामला व कल्याणी, उषादेवी, शचीदेवी, तिची स्वतःची माता स्वाहादेवी, देवी कालिका तिच्या समोर उभ्या होत्या. तिने त्या सर्वांना प्रणाम करुन आपल्या देहातील त्या -त्या देवतेचे अंश परत केले. तसे ते अंश ग्रहण करत त्या देवींनी तिला आशिष दिले. त्यानंतर कृष्णेने नेत्र मिटले व ती

मूळच्या रुपात प्रकट झाली. जे शक्तीचे उज्ज्वल व शांत स्वरुप होते, अशी स्वर्गलक्ष्मी, श्री व कृत्या.

ती आरक्त कमळावर आरुढ झालेली होती. तिच्या अनेक भुजांमध्ये धनुष्य, धनाचा कलश, वज्र, खड्ग, त्रिशूल, कमल व शंख अशी प्रकाशमयी आयुधे होती. तिने आपल्या लोकाचे अर्थात स्वर्गातील शचीलोकाचे स्मरण केले व तेथे प्रस्थान केले. ती आता स्वर्गाच्या मुख्य व मध्य स्थानावर स्थापन झाली होती. स्वर्गातील अनेक देवतांनी तिला प्रणाम केला, तसा तिने त्यांना प्रतिप्रणाम केला. तत्क्षणी तिने पाहिले, वायुदेवतेसह भीमसेन, तर नारायणासह नररुपी अर्जुन, अश्विनीकुमारांसह नकुल, तर शुक्राचार्यांच्या अंशरुपात सहदेवही स्थित होते. पांचालीचे पाचही पुत्र विश्वेदेवांच्या रुपात स्थित होते. चंद्राजवळ सुवर्चारुपात अभिमन्यू, तर कलि व द्वापारच्या रुपामध्येही दुर्योधन व शकुनी होते. तर धृति व सिध्दीच्या रुपात माद्री व कुंती, तर माया व मतीच्या रुपात सुभद्रा व गांधारीही

उपस्थित होत्या. अग्निरुपी धृष्टद्युम्नही तेथेच उपस्थित होता. मात्र पांडुपुत्रांना (चारही) पांचालीला या रुपात पाहून आश्चर्य वाटले होते. मात्र अग्निदेवाने त्यांच्यातील अस्फुट वार्तालाप ऐकून म्हटले, "शांत व्हा,आपण. आपणां सर्वांना आपल्या प्रश्नांची उत्तरे काही क्षणांतच इंद्रदेव अथवा महादेव देतील." त्याक्षणी अकस्मात इंद्रदेव यमधर्मासह स्वर्गाच्या त्या सभेत प्रवेशला. त्यांच्यासह युधिष्ठिरही होता. त्याच्या शरीरावर मात्र जीर्ण वस्त्रे होती. त्याचे शरीर व वस्त्रे धुळवडलेली होती. तो आश्चर्याने सर्वत्र पाहत होता. त्याने आपल्या पुत्रांना, भ्रात्यांना, मातापित्यांना आपल्या मूळच्या स्वरुपांमध्ये पाहिले, मात्र ज्याक्षणी त्याने पांचालीला शक्तीच्या स्वरुपात पाहिले, त्याक्षणी त्याने आश्चर्याने म्हटले, "ही आमची प्राणप्रिया-कल्याणी आहे का?"

यावर इंद्राने म्हटले, "ही द्रौपदी असामान्य आहे. कारण ती अयोनिजरुपात शक्ती आहे. साक्षात स्वर्गाची लक्ष्मी मनुष्य लोकांत अवतीर्ण झाली होती. याशिवाय या

महासंग्रामाची ही कृत्याही आहे. तिच्या त्या रुपामध्ये देवी भारती, देवी श्यामला, देवी भ्रदकाली, देवी उषा, देवी स्वाहा व देवी भवानींचा असे विभिन्न देवतांची अंश स्थित होते.

तत्क्षणी तिथेच उपस्थित असलेल्या महादेवांनी म्हटले, "मला ज्ञात होते, पाच महान देवतांचे अंश देवी कुंती व देवी माद्रीच्या उदरी जन्मणार आहेत, त्याकारणे मी तुम्हां सर्वांना या उग्र कृत्ये करवे सुख, प्रेरणा, आनंद, यश, कीर्ती व उत्तम अपत्य प्राप्त व्हावे म्हणून या कृत्येमध्ये मी शांत -सरलतेचे तत्वही स्थापित केले."

हे श्रवण करुन युधिष्ठिराने महादेवांना व इंद्रदेवांना प्रणाम केला. त्याक्षणी इंद्रदेवाने म्हटले, "पुत्रा! युधिष्ठिरा, तू सर्व प्रथम पार्थिव शरीराचा त्याग करावास, त्याकारणे तुला तुझा मूळ दिव्य देह/शरीर व स्वरुप प्राप्त होईल." असं म्हणत इंद्राने त्याला स्वर्गाच्या दिव्य नदीच्या निकट म्हणजे

स्वर्गगंगेच्या समीप नेले, “ही स्वर्गाची दिव्य गंगा आहे. ही दिव्य नदी आहे. या नदीमध्ये तू स्नान कर.”

युधिष्ठिराने दिव्य गंगेची व प्रार्थना केली आणि गंगेमध्ये स्नान केले, त्याक्षणीच त्याला आपले दिव्य यमस्वरुप प्राप्त झाले. त्यानंतर त्याने स्वर्गामध्ये प्रवेश केला आणि कौरवांविषयी द्वेष व क्रोध त्यागत त्याने कौरवांना भेटून आनंद व्यक्त केला. याखेरीज त्याने पांचाली व अन्य पांडवांना, आपल्या मातांना युधिष्ठिराने मूळ स्वरुपात पाहिले आणि त्यांच्या सहवासात निवास करण्याची इच्छा व्यक्त केली.

तू ऐकून द्रौपदीने मंदस्मित करत म्हटले, “माझे व आपणां सर्वांचे भावबंध तर अजरामरच आहेत आणि सहवास तर सदैवच असणार आहे.”

**समाप्त**

# परिशिष्ट

१) गवाक्ष :- वातायन, खिडकी, झरोका

२) नियतकक्ष :- ठरलेला कक्ष

३) इदमस्तु :- असेच असो, असे होवो.

४) आपादमस्तक :- पायापासून ते डोक्यापर्यंत

५) प्रवेणी :- वेणीचा प्रकार

६) केशपाश :- केशांचा बुचडा

७) मानखंडना :- अपमान

८) ऋत्विजपूजन :- ऋषिंचे पूजन, ब्राह्मण पूजन

९) अभिदान :- दान करणे

१०) निर्वहन :- पालन, वहन

११) अभिभ्रमण :- भ्रमण

१२) समानुभूती :- सहानुभूती

१३) क्षीणवप्रा :- नापीक, ओसाड

१४) अनुताप :- पश्चाताप

१५) सौंध :- गच्ची

१६) गोपुर :- बुरुज

१७) शकटिका :- गाडी (बैलगाडी, घोडागाडी)

१८) चौर्यकर्म :- चोरी

१९) भातृहन्ता :- भावाला मारणारा

२०) मृत्तिका :– माती

२१) सामग्र्यागार :- सामुग्री आगार, स्थान

२२) मृदा परीक्षक :- मोहरा, नाणी परीक्षण करणारं यंत्र

२३) क्षोभहिम :- क्रोधरुपी बर्फ, हिम

२४) क्षेत्रपुरुष :- वास्तुपुरुष, स्थानपुरुष

२५) श्रेयस :- हितकारक

२६) प्रेयस :- प्रिय

२७) अध्येता :- विद्यार्थी

२८) स्थविंर :- वृद्ध

२९) क्रयासाठी :- विक्री

३०) क्षुरप :- एक धारदार व तीक्ष्ण बाणांचा प्रकार

३१) उपनीयमान :- जवळ घेण्याचा योग्यतेचा, सत्कार करण्याचा योग्यतेचा

३२) भृंगरुचिर :- भुंग्यासारखे काळे, भ्रमर

३३) व्यवधान :- खंड

३४) उपखंड :- मोठा तुकडा

३५)	तूणीर :- भाता

३६)	अग्निशलाका :- अग्निची स्फुल्लिंग, ठिणग्या

३७)	हिरक :- हिरा

३८)	शौनक :- भृगुवंशी शुनकपुत्र, ऋषि व आचार्य, ज्यांनी विभिन्न ग्रंथांमध्ये आपले योगदान दिले.

३९)	चार्वाक :- अवैदिक तत्वज्ञान निर्माण करणारे ऋषि

४०)	नश्यमान. :- नाश पावणारे

४१)	अभ्युदय :- प्रगती, उत्थान

४२)	अंशुके :- दुकूल

४३)	मंजुषा. :- पेटी

४४)	मातृल :- आईचा भाऊ, मामा

४५)	शतयूप :- शत यूप उभारणारा, शंभर यज्ञ करणारा, येथे अर्थ केकेयचा राजकुमार

४६)	हिमप्रपात :- बर्फाचा मोठा खंड

४७)	कपित्थ. :- कवठ


***हे पुस्तक कसे वाटले, हे***


***shaktileelanikita@gmail. com***

***या माझ्या इमेल आयडीवर रिप्लाय देऊन कळवा.***

## निकिता पाटील यांची ई साहित्यवर इतर प्रकाशित पुस्तके


**पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा**















# निकिता पाटील यांची ई साहित्यवर प्रकाशित पुस्तके















## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्षं.

## निकिता पाटील यांचं ई साहित्यवरचं हे चौदावं पुस्तक.

निकिता राजेश पाटील ही विद्यार्थिनी मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या यापुर्वीच्या पुस्तकांचे कौतुक जाणकार वाचकांनी केले आहे.

अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे,

यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी, दिपूजा चव्हाण असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?